गेल्या वर्षभरात देशाच्या सीमांचे रक्षण करताना

हौतात्म्य पत्करलेल्या वीर जवानांना,

महाराष्ट्रातील व्यवस्थेचे बळी पडत

आत्महत्या करणाऱ्या

बळीराजास आणि

प्रागतिक विचारांसाठी आपल्या श्वासाची

किंमत मोजणाऱ्या महाराष्ट्रातील थोर विचारवंताना ...

# अर्पण...

# - अनुक्रमणिका -


| | |
|---|---|
| प्राचार्यांचे मनोगत | ५ |
| संपादकीय | ७ |
| नजरेतले महापुरूष | ९ |
| जाणिवांचे अंतरंग | २० |
| काव्यसुमन | ४५ |
| झरोका | ५९ |
| सचित्र महाविद्यालय | ६९ |

## प्राचार्यांचे मनोगत .....

**'शिवराय'** या महाविद्यालयीन वार्षिक अंकाची नाविण्यपूर्ण सलग तिस-या वर्षी 'ई' आवृत्ती वाचकांच्या हाती देताना मला मनस्वी आनंद होतो आहे. शिक्षणातून व्यक्तिमत्व घडते व व्यक्तीमत्वाचा विकास होण्यासाठी 'परिवर्तनाची' आवश्यकता असते. 'शिवराय' हा वार्षिक अंकसुध्दा परिवर्तनातून 'ई' आवृत्तीमध्ये रूपांतरीत होत आहे.

रेणापूर सारख्या ग्रामीण भागात उच्च शिक्षणाची सोय नव्हती. अशा दुर्गम भागात, ग्रामीण विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध व्हावी व ते शहरी भागातील विद्यार्थ्याबरोबर शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात यावे या उदात्त हेतूने माजी आमदार मा.श्री. शिवाजीराव पाटील कव्हेकर (संस्थापक अध्यक्ष) यांनी महाविद्यालयाची सुरुवात १९९३ साली केली. साडे पाच एकर संस्थेच्या स्वतःच्या मालकीच्या जागेवर अद्ययावत 'इनडोअर स्टेडीयम' उपलब्ध आहे. शिक्षणाबरोबर खेळाची आवड निर्माण व्हावी, विद्यार्थी मानसिक व शारीरिक दृष्ट्या सुदृढ व्हावे म्हणून महाविद्यालयात अनेक उपक्रम राबविले जातात.

सामाजिक बांधीलकीच्या दृष्टीकोनातून एन.एस.एस. च्या माध्यमातून सर्वरोगनिदान शिबीर, पशुरोगनिदान शिबीर, रक्तदान शिबीर, पाणी बचाव, बेटी बचाव, मतदार जागृती अभियान राबविले जातात. सांस्कृतिक व वक्तृत्व मंडळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्ती प्रकटनाला संधी उपलब्ध करून दिली जाते.

विद्यार्थी व प्राध्यापकांच्या ज्ञानात भर पडावी या अनुषंगाने वाणिज्य विभागातर्फे शॉर्ट टर्म कोर्सचे आयोजन करण्यात आले. याचा फायदा देशभरातून आलेल्या जवळपास ६० संशोधकांना झाला. विद्यापीठ पातळीवर बँडमिंटन व टेबल टेनिस स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

आमच्या विद्यार्थ्यांनी बारावी बोर्ड तथा विद्यापीठीय परीक्षांमध्ये नेहमी प्रमाणे याही वर्षी उज्ज्वल यश संपादन केले. तसेच सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा तथा कला इ. क्षेत्रात वेगळा ठसा उमटविला आहे. प्रातिनिधिक स्वरूपात या सर्व बाबींचा अंर्तभाव या तिस-या वर्षात पदार्पण करणा-या 'ई' वार्षिक अंकात करण्याचा प्रयत्न संपादक मंडळाने केला आहे.

'ई' अंक काढण्याच्या पाठीमागची भूमिका या अगोदरच पूर्वीच्या अंकात विशद केली होती. पुनरावृत्ती होत असल्याची जाणीव असतानासुध्दा परत नमूद करणे आवश्यक वाटते. 'ई' अंकामुळे तंत्रज्ञानाची ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना ओळख होते व पैशाची पण बचत होते. या वर्षी अंक महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याचा आमचा मानस असून वर्षभर ते विद्यार्थ्यांना बघता येईल. यामधील उणिवांसह आमचा हा प्रयत्न स्वीकाराल याची आम्हाला खात्री आहे. (महाविद्यालयाची वेबसाइट - www.shivajimahavidyalaya.com)

**- डॉ. आर.एस. अवस्थी**
**प्राचार्य**

## संपादकीय..

### कार्यकारी संपादकाच्या डेस्कवरून...

### 'शब्द, जिन्हें भूल गई है भाषा...'

आजचा काळ संक्रमणाचा काळ आहे. जागतीकीकरणानंतर बदललेला समाज, बदललेली जीवनमूल्य, बदललेले समाज मन, जातीच्या अस्मितांचे अधिक तीव्र होणे, भौतिक सुखाचा मृगजळ, शिक्षणाचे होत चाललेले बाजारीकरण (ज्याच्या खिशात पैसा त्यांचेच शिक्षण), संस्कृतीची संकुचित होत चाललेली दालने, धर्माचे होत चाललेले कर्मकांडीकरण, कलेच्या क्षेत्रातील अधःपतन आणि माणसांच्या भाव-भावनांचे 'फ्रिज' होणे, या कांही ठळक घडामोडी आहेत. ज्यामुळे समाजाची धुळधाण होताना दिसते आहे. अशा चक्रव्यूहात पुरते अडकलेल्या काळात 'शिवराय' चा 'ई-वार्षिक' अंक सलग तिस-या वर्षी आम्ही आपल्या हाती देत आहोत.

शब्द संस्कृतीच्या जन्मापासून माणसांने एक मूल्यव्यवस्था तयार केली. देवाण-घेवाण, अनुभवांचे रूंदावत जाणे आणि मानवी जीवनाला अधिक प्रतिष्ठा मिळावी, यासाठी धडपडणारे कार्यकर्ते, विचारवंत, समाजसेवी यांचा प्रयत्न दिसून येतो आहे. शब्दांच्या प्रपंचात काम करणा-यांना याची पुरेपूर जाणीव असते. शब्द माणसाला ज्ञानाकडे, विचाराकडे, विवेकाकडे आणि प्रागतिक जीवनमूल्यांकडे घेऊन जाणारे 'वाहक' असतात. शब्दांच्या माध्यमातून संस्कृतीचा (सर्वदेशीय, सर्वव्यापी) जन्म होत असतो. कुणाला तरी वगळून किंवा कुणालातरी गृहीत धरून समाज गतीवान होत नसतो. माणसाच्या कर्तृत्वावरचा विश्वास, माणसांच्या चांगुलपणावरचा विश्वास, नव्या मूल्य व्यवस्थेवरचा विश्वास किंबहूना माणसा-माणसातील 'संवाद' प्रक्रियेवर असलेला विश्वासच नवीन समाज व्यवस्थेची बांधणी करण्यासाठी आवश्यक असतो. जगातल्या तमाम विचारवंतानी तत्ववेत्यांनी, महापुरुषांनी 'माणूस' नावाच्या संज्ञेला केंद्रस्थानी ठेवून सगळ्या चळवळी, आंदोलने चालविली ज्यात प्रामुख्याने 'शब्द' हेच माध्यम म्हणून वापरले. परंतु आज शब्दांचा जेवढा म्हणून सद्उपयोग होणे अपेक्षीत होते त्यापेक्षा अधिक दुरुउपयोग झाल्याचे दिसून येते आणि त्यास मानव जातच कारणीभूत आहे. संस्कृती सोपान चढता-चढता मानवाने मानवासाठी अनेक विधायक तरतूदी करून ठेवल्या आणि अगदी त्याचवेळी माणूस नावाच्या संज्ञेवरचा विश्वास उडावा इतके संस्कृतीचे विकृतीकरणही करून ठेवले. म्हणूनच आज माणसांच्या जगात 'शब्दांना' फारसी किंमत उरलेली नाही. आज फक्त आणि फक्त

संधीसाधूपणा, वेळकाढूपणा आणि सज्जनतेचा बुरखा पांघरून सज्जनतेचा आव आणणारी जमात उदय पावताना दिसते आहे. जागतीकीकरणानंतर माणसाचे जगणे महाग आणि मरण स्वस्त होताना दिसते आहे. तिथेच भाषेतून शब्दांचे लोप होणे (भाषांचे अस्तित्वच संपुष्टात येणे) मानव संस्कृतीपुढेच मोठे आव्हान ठरते आहे.

अशा एका विषण्ण अवस्थेत जिथं विरोधी पक्षाच्या 'शब्दांना' महत्व उरलेले नाही. कालचे सत्ताधारी आजचे विरोधी आणि आजचे सत्ताधारी उद्याचे विरोधी. दोघेही सत्तेचा मलिदा ओरबडून ढेकर देत लोकांच्या दुखांचे गाठोडे संसदेच्या व विधानसभेच्या दालनात मांडतात, तेव्हा हसू आल्याशिवाय राहत नाही. नेमक याचवेळी महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थीनी (तरूण-तरूणी) आपल्या 'शब्दांच्या' अभिक्रमावरचा विश्वास प्रगाढपणे दाखवतात. ही आपल्यासाठी भविष्योन्मुखी सुवर्ण संकेत आहे. अस मानायला हरकत नाही. या अंकात अनेक तरूण तरूणींनी आपल्या अनुभवांचे, सृजनशीलतेचे, शब्द जाणीवांचे विश्व साकारण्याचा प्रयत्न केला आहे. आपण लिहिलेले कोणीतरी वाचावे, किंबहुना आपल्याही लिहाता येत याचं किती मोठ अप्रुप. या ई-वार्षिक अंकाच्या निमित्ताने प्रकाशित होणारे लेख, कविता, निबंध हा अनुभवाचा जीवंत साक्षात्कारच होय. यातून तरूण मनाचा वाटा आणि वळणे लक्षात येऊ शकतील. अर्थात हे तरूण मनांचे काळजातील कोंदण. या अंकाच्या निमित्ताने ते प्रकाशित होत आहे, याचा मनस्वी आनंद!

या वार्षिक अंकासाठी मोलाचे सहकार्य करणारे प्राचार्य डॉ.आर.एस.अवस्थी, संपादक मंडळातील सर्व सहकारी प्रा. शेख एम.आय., प्रा. नागरगोजे जी.आर., प्रा. शेळके पी.डी. व प्रा.स्वामी यांचे विशेष आभार.

शेवटी शब्द पंढरीचा वारकरी असल्यामुळे शब्दांप्रती कृतज्ञता व्यक्त करतो.....

**'ह्रदयाची हळूवार स्पंदने शब्दांनी बोलावी, विश्वाची अभिजात कल्पना अर्थातून फुलावी,**
**जीवन अवघे नाद स्वरांनी बहरावे, छेडिता गझल आर्तमनाची ओठी दाद फुलावी'**

**धन्यवाद...!**

**प्रा.डॉ.सतीश यादव**
कार्यकारी संपादक,
शिवराय 'ई-वार्षिक अंक'

# नजरेतले महापुरुष

# १ कौटिल्य

**जीवन परिचय :-**

कौटिल्याच्या जीवनासंबंधी विवाद आहेत. विष्णुपुराण, कामन्दक, नीति, दशकुमारचरित नितिवाक्यामृत इ. प्राचीन ग्रंथात अर्थशास्त्राचा रचनाकार कौटिल्यच असून त्यास चाणक्य आणि विष्णुगुप्त असे म्हटले जाते असा उल्लेख आहे. त्याने चंद्रगुप्त मौर्यासाठी शास्त्राचा अभ्यास केला आणि तत्कालीन शासनासंबंधीचे विचार आणि व्यवहाराचे मनन करून शासनासंबंधीचे काही नियम किंवा तत्वांची निर्मिती केली. कांही विचारवंताच्या मते मात्र कौटिल्य हे कोणत्याही व्यक्तीचे नाव नसून ते एका राजकीय परंपरेचे प्रतीक आहे किंवा त्यातून राजकारणातील कुटनीतीचे दर्शन होते. ही कुटनीती शत्रुबरोबर कसे धोकादायक व्यवहार केले जावेत यासंबंधी आहे.

कौटिल्याच्या जन्मस्थाना विषयीही मतभेद आहेत. जैनधर्मातील ग्रंथानुसार त्यांचे जन्मस्थळ कर्नाटक राज्यातील श्रावण बेळगोळ हे असून बौध्द धर्मग्रंथानुसार मात्र त्यांचे जन्मस्थळ तक्षशीला आहे. काही विद्वान त्यांचा जन्म नेपाळमधील तराई येथे झाला असे मानतात. परंतु अनेकांच्या मते मात्र त्याचे कार्यक्षेत्र मगध राज्यच आहे. विशाखादत्ताच्या मुद्राराक्षस या नाटकावरून त्याच्या जीवनाची माहिती मिळते. कौटिल्याचे शिक्षण नालंदा विश्वविद्यालयात झाले. मगध राज्यातील तत्कालीन नंदवंशाचा सम्राट महापद्मनंदाचा प्रधान मंत्री शकटार व कौटिल्याचे शत्रुत्व होते. कौटिल्य शामवर्णीय शेंडीधारी ब्राम्हण होता. तसेच तो अतिशय रागीट आणि तापट स्वभावाचाही होता. कौटिल्याचा अपमान करण्यासाठी शकटाराने एक षडयंत्र रचले. त्याने कौटिल्यास राज

दरबारात बोलावून सर्वोच्च स्थानी बसविले हे पाहून महापद मानंद क्रोधीत झाला व कौटिल्याचा अपमान करून त्यास राजदरबारातून हाकलून दिले. परंतु जाताना कौटिल्याने मी नंदवंशाचा नाश केल्याशिवाय शेंडीची गाठ बांधणार नाही अशी प्रतिज्ञा केली.

नंदवंशाचा नाश करण्यासाठी कौटिल्याने आपला शिष्य चंद्रगुप्त मौर्याच्या मदतीने मगध राज्यावर आक्रमण केले. नंदवंशाचा नाश केला व मौर्याच्या साम्राज्याची स्थापना केली. चंद्रगुप्त मौर्याने कौटिल्यास आपला प्रधानमंत्री म्हणून नियुक्त केले. याच चाणक्याने 'अर्थशास्त्र' या ग्रंथाची निर्मिती केली. चाणक्याचे नाव विष्णुगुप्त असेही होते. त्याच्या वडिलाचे नाव चणक असल्यामुळे त्यास चाणक्य असे नाव मिळाले. त्यास कौटिल्य या नावानेही आळखले जाते. कारण त्याच्या कुटनितीमुळेच नंद घराण्याचा नाश होऊन मौर्य साम्राज्याची स्थापना झाली होती.

**लकडे आकाश श्रीमंत**

बी.ए. तृतीय वर्ष

# २ पंडित जवाहरलाल नेहरू

**जीवन परिचय :-**

पंडित जवाहरलाल नेहरू हे आधुनिक स्वतंत्र भारताचे निर्माते आणि शिल्पकार मानले जातात. त्यांचे व्यक्तिमत्व अष्टपैलू होते. समाजवाद आणि लोकशाही प्रेरणांचे मिश्रण असलेला एकमेव राज्यकर्ता, आंतरराष्ट्रीय शांतता आणि स्नेहभाव, प्रचाराची दृष्टी असलेला अलौकिक, तसेच चमत्कारीक नेता, वेगळ्या दृष्टीकोनातून लिखाण करणारा लेखक, धर्मनिरपेक्षतेचा प्रचारक, तत्कालीन घडामोडीचे विश्लेषण करणारा विश्लेषक, विचारवंत, मानवता आणि गरीबीविषयी तळमळ असलेला प्रशासक, मुलांचे चाचा नेहरू आणि जनतेचा पाठिंबा असलेला जननेता इ. विविध पैलू त्यांच्या व्यक्तिमत्वात होते. त्यांच्या कारकिर्दीला 'नेहरू युग' असेही म्हटले जाते.

नेहरूंचा जन्म १४ नोव्हेंबर १८८९ साली श्रीमंत कुटुंबात झाला. त्यांचे वडील मोतीलाल नेहरू हे एक प्रसिध्द वकिल आणि सामाजिक कार्यकर्ते होते. नेहरूंच्या वागण्यात जो रुबाबदारपणा आणि खानदानी शालीनता होती ती त्यांच्या घराण्याची देन होती. त्यांचे शिक्षण भारत आणि इंग्लंडमध्ये झाले. इंग्लडमधील हॅरो या शाळेत व केंब्रीज विद्यापीठात त्यांनी शिक्षण घेतले. त्यांचे वडील वकिल असल्यामुळे सहाजिकच कांही काळ त्यांनीही वकिली केली, परंतु त्या व्यवसायात ते रमू शकले नाहीत. लोकमान्य टिळकांनी सुरु केलेल्या होमरूल चळवळीकडे ते आकर्षित झाले. नंतर त्यांचा गांधीशी संबंध आला व त्यांच्या व्यक्तिमत्वाने ते भारावून गेले. महात्मा गांधींचा प्रभाव नेहरूवर कायमचा राहिला. गांधींच्या असहकार चळवळीत त्यांनी भाग घेतला व

कारावास पत्करला. १९२८ साली त्यांनी संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी करणारा ठराव केला. १९२३ साली स्वदेश कार्यक्रमात त्यांचा सहभाग होता. १९२७ साली मागासलेल्या अविकसित राष्ट्रांच्या संमेलनात त्यांनी काँग्रेसचे प्रतिनिधीत्व केले. १९३० नंतर नेहरूना अनेकदा तुरुंगात जावे लागले. तुरुंगातच त्यांनी मार्क्स आणि लेनिनच्या विचारांचा सखोल अभ्यास केला व समाजवादावरील त्यांची श्रध्दा अतिशय दृढ झाली. काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदी त्यांची तीन वेळा निवड झाली. १९३८ सालच्या लखनौ काँग्रेसच्या अधिवेशनात अध्यक्ष पदावरून भाषणे करताना त्यांनी समाजवादाचा पुरस्कार केला. १९४२ च्या चलेजाव चळवळीत त्यांना अटक झाली. १९४५ पर्यंत ते तुरुंगात होते १९४६ मध्ये पुन्हा काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली. १९४६ साली हंगामी सरकारचे पद त्यांनी स्विकारले. १५ ऑगस्ट १९४७ साली भारत स्वतंत्र्य झाल्यानंतर ते पहिले पंतप्रधान झाले. १९५४ मध्ये जागतिक शांतता आणि सहजीवनासाठी त्यांनी पंचशील तत्वे निर्माण केली. अविकसित देशांच्या विकासासाठी अलिप्ततावादी चळवळीचा पाया घातला. १९६२ मध्ये चीनने भारतावर अचानक आक्रमण केले त्यात भारताचा पराभव झाला. त्यामुळे नेहरू खचले ते कायमचेच. यातून ते स्वतःला सावरू शकले नाहीत व २७ मे १९६४ रोजी त्यांचे निधन झाले. परंतु ते पंतप्रधानपदावर असताना लोकातील दारिद्रय, जातीवाद, निर्वासितांचे प्रश्नांची सोडवणूक करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. नेहरूंजीमुळे भारताची जगात एक प्रतिमा निर्माण झाली होती.

नेहरूंच्या व्यक्तिमत्वावर अनेक लेखक, कवी, नाटककार, राजकिय नेते यांचा प्रभाव होता. इंग्लंडमध्ये असताना त्यांच्यावर मिल, ग्॓डस्टन, मोर्ले यांचा प्रभाव निर्माण झाला व त्यातूनच त्यांचा उदारमतवाद निर्माण झाला. बर्नार्ड शॉव. रसेलमुळे त्यांच्या समाजवादी विचारसरणीस आकार आला. एस.जी.वेल्स व स्कॉट यांच्या कादंब-या वाचून ते मार्क्सवादाकडे आकर्षित झाले. विज्ञान व थिऑसॉफिचाही त्यांच्यावर प्रभाव होता. रूस, जपानी युध्दामुळे त्यांच्यात राष्ट्रवादाची भावना निर्माण झाली. गॅरिबाल्डीच्या पुस्तकातून राष्ट्रभावनेला प्रोत्साहन मिळाले. टिळक, वडील

मोतीलालजी यांचाही प्रभाव नेहरूवर होता, परंतु महात्मा गांधीचा मात्र त्यांच्यावर निर्णायक प्रभाव पडला. नैतिकता, साधनशुचिता व इतर आदर्श तत्त्वे त्यांनी गांधीजीकडून स्विकारली. या सर्वांच्या प्रभावामुळे त्यांच्या व्यक्तिमत्वाला एक निश्चित आकार आला.

पंडित नेहरू जसे स्वतंत्र भारताचे पंतप्रधान आणि भाग्यविधाते म्हणून ओळखले जातात. तसेच एक तत्वचिंतकही म्हणून त्यांची सर्व जगाला ओळख आहे. त्यांच्या तत्वचिंतनाचे प्रतिबिंब भारतीय जीवनाच्या सर्व अंगात पडल्याचे दिसते.

**कु. गरड सुकेशनी सुधारक**

बी.ए.तृतीय वर्ष

# ३ महात्मा गांधी

## ग्रामीण विकास ग्रामस्वराज्याची संकल्पना

**जीवन परिचय :-**

महात्मा गांधी हे विसाव्या शतकातील अलौकिक आणि असामान्य व्यक्तिमत्व मानले जाते. त्यांनी तत्कालीन भारताच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकिय विचारसरणीवर खोल ठसा उमटविला आहे. तसेच ते आधुनिक भारतातील शांततापूर्ण क्रांतीचे जनकही समजले जातात. महात्मा गांधी हे रूढार्थाने नव्हते, परंतु त्यांनी मानवाच्या पुनरूत्थानासाठी, समाजाच्या पुनर्बांधणीसाठी आणि राजकारणासाठी काही मुलभूत संकल्पनांची निर्मिती केली. या अर्थाने गांधींना नैतिक, सामाजिक, राजकिय आणि प्रशासकिय विचारवंत असे म्हटले जाते. त्यांना प्रेषित, शिक्षक आणि नेता असे मानले जाते. परंतु शंकराचार्य किंवा कांट प्रमाणे घराघरादी चर्चा करणारे नव्हते. त्यांनी धर्म तत्वज्ञान, नितीशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र आणि प्रशासन अशा अनेक विषयावर लिखाण केले. त्यांच्या विचारात अंतर्विरोधही होता. म्हणून त्यांना असामान्य विरोधाभासी असे म्हटले जाते.

महात्मा गांधीचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ साली गुजरातमधील पोरबंदर येथे झाला. त्यांच्या घरातील वातावरण अतिशय धार्मिक होते. आई धार्मिक व वडील अतिशय सात्विक आणि पापभिरू होते. या वातावरणाचा परिणाम त्यांच्यावर झाला. १८८७ साली एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण होऊन कायद्याच्या अभ्यासासाठी ते इंग्लडला रवाना झाले. कायद्यातील बॅरिस्टर पदवी संपादन करून ते भारतात परतले. काही वर्षे वकिलीही केली. नंतर एक खटला चालविण्यासाठी ते दक्षिण आफ्रिकेला गेले. हीच घटना त्यांच्या आयुष्याला वेगळे वळण देणारी

ठरली. दक्षिण आफ्रिकेत गोरे लोक हिंदी लोकांना अतिशय तुच्छ आणि तिरस्काराने वागवत. त्यांच्यावर विविध प्रकारचे जुलूम, अन्याय व अत्याचार ही करीत. या अत्याचाराचा प्रतिकार करण्याचे ठरवून गांधींनी तेथे काँग्रेसची स्थापना केली व गो-या लोकांविरूध्द लढण्यासाठी सत्याग्रह व शस्त्राचा प्रथमच वापर केला. १८९४ ते १९१५ पर्यंत त्यांनी अहिंसा व सत्याग्रहाच्या मार्गाने ब्रिटिशांच्या हुकूमशाही व जुलूमशाहीविरूध्द लढा दिला व भारतीय लोकात त्यांनी एक नवा आत्मविश्वास निर्माण केला. या संघर्षातून एक नवे गांधी तयार झाले. महात्मा गांधी १९१५ मध्ये भारतात परत आले त्यावेळी भारतीय राजकारणात 'टिळकयुग' होते. भारतात परतल्यावर त्यांनी बिहारमधील चंपारण्यातील निळीच्या शेतक-यांवर व शेतमजूरांवर होणा-या अन्यायाविरूध्द लढा दिला. या लढ्यातही त्यांना यश मिळाले व संपूर्ण भारताचे लक्ष त्यांनी वेधून घेतले. १९१५ मध्ये ब्रिटिश सरकारने संमत केलेल्या जुलमी रिलेट कायद्याविरूध्द चळवळ उभी केली. परंतु ती हिंसक बनल्यामुळे रद्द करण्यात आली. १९२० साली लोकमान्य टिळकांचा मृत्यू झाला. टिळकयुगाची समाप्ती होवून गांधीयुगाची सुरुवात झाली. १९२१ ते १९४७ हा 'गांधीयुग' किंवा गांधीचा कालखंड समजला जातो. १९११ साली असहकार आणि खिलाफत चळवळीला दिलेल्या पाठिंब्यातून हिंदू-मुस्लिम ऐक्याचा त्यांनी प्रयत्न केला.

१९४२ पासून महात्मा गांधीनी ब्रिटिशांना अंतिम आणि निर्वाणीचा इशारा देण्यासाठी भारत छोडो आंदोलन हाती घेतले. यातून ब्रिटिश सरकार कमजोर झाले. परंतु भारताला स्वातंत्र्य मिळताना भारत-पाकिस्तान अशी दुर्दैवी फाळणी स्विकारावी लागली. या घटनेतूनच त्यांची १९४८ साली हत्या झाली व गांधीपर्वाचीही समाप्ती झाली. परंतु त्यांच्या विचारांचा प्रभाव मात्र अजूनही कमी झालेला नाही.

**कु. अलका बाबू राठोड**

बी.ए.तृतीय वर्ष

# ४ डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## प्रशासनाच्या रचनेची संकल्पना, आर्थिक धोरण आणि सामाजिक विकास

**जीवन परिचय :-**

आधुनिक भारताच्या निर्मितीसाठी ज्या थोर समाजसेवकांनी, क्रांतीकारी वीर पुरुषांनी व राजकिय मुत्सद्यांनी प्रयत्न केले त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचीही गणना केली जाते. आदर्श विद्यार्थी, झुंजार समाजधुरीण, थोर अर्थशास्त्रज्ञ, घटनातज्ञ, विवेचक दृष्टी असणारे संपादक तसेच प्रशासकीय विचारवंत असे अनेक पैलू त्यांच्या व्यक्तिमत्वात होते. बुध्दीप्रामाण्य हा आंबेडकराचा सर्वात मोठा गुण होता. आंबेडकर हे जरी दलित वर्गात जन्माला आले तरीही त्यांचे एकंदरीत विचार हे संपूर्ण समाजसुधारणेसंबंधी होते. भारतीय समाजव्यवस्था ही विषमता आणि शोषणांवर आधारलेली आहे त्यात समता निर्माण झाली पाहिजे यासाठी त्यांनी शेवटपर्यंत प्रयत्न केले. अनेक सामाजिक, राजकिय, आर्थिक चळवळी उभारल्या, लढे दिले आणि प्रचंड लिखाणही केले. वृत्तपत्रेही काढली म्हणून आंबेडकरांना 'समाजपरिवर्तनाचा दूत' असेच म्हणावे लागेल.

डॉ. आंबेडकरांचा जन्म मध्यप्रदेशातील महू या गावी १४ एप्रिल १८९१ मध्ये झाला. रत्नागिरी जिल्ह्यातील आंबेवडे हे त्याचे मुळ आडनाव आंबेडकर असे ठेवले. आंबेडकरांचे वडील रामजी हे लष्करात सैनिक होते. ते अतिशय धार्मिक वृत्तीचे आणि मेहनती होते. रामायण, महाभारत या ग्रंथाचा त्यांच्यावर प्रभाव होता. परंतु नंतर जातिविरोधी असलेल्या कबीर पंथात सामील झाले. आंबेडकरांनी आपले प्राथमिक शिक्षण दापोलीला व माध्यमिक शिक्षण साता-याला पूर्ण केले. नंतरचे शिक्षण मात्र त्यांनी मुंबईत पूर्ण केले. संपूण विद्यार्थी दशेत आणि नंतरही

सार्वजनिक जीवनात जातियतेचा त्यांना अतिशय त्रास झाला. महाविद्यालयीन शिक्षणासाठी बडोद्याचे संस्थानिक सयाजीराव गायकवाड यांनी मदत केली. १९३१ मध्ये ते पदवी परीक्षा उत्तीर्ण झाले. पुन्हा सयाजीराव गायकवाडानीच त्यांना अमेरिकेत उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती दिली. १९१५ मध्ये कोलंबिया विद्यापीठातून, त्यांनी एम.ए.ची पदवी संपादन केली. १९१६ मध्ये त्यांनी प्राचीन भारतातील व्यापार पध्दती यावर प्रबंध लिहून संशोधन पदवी मिळविली. तसेच 'भारतातील जाती' यावर एक दीर्घ प्रबंध लिहिला. परदेशात प्रा. एडविन सेलिग्नन हे त्यांचे विशेष आवडते गुरु. प्रा. सेलिग्ननी त्यांच्या संशोधन कार्यासंबंधी गौरवोद्‍गार काढले होते. आंबेडकरांनी 'राष्ट्रीय उत्पन्न' यावरही एक निबंध लिहिलेला होता. पुढे त्याचाच विस्तार करून 'ब्रिटिश भारतातील प्रांतीय आर्थिक रचनेची उत्क्रांती' या नावाचे एक पुस्तकही लिहिले.

अमेरिकेतून परत आल्यानंतर ते सयाजीराव गायकवाड महाराजांच्या बडोदे संस्थानात नोकरी करू लागले. परंतु अस्पृश्य असल्यामुळे त्यांना राहण्यास जागा मिळेना. आणि दरबारातही उच्चवर्णीयांकडून त्रास झाल्यामुळे त्यांनी ती नोकरी सोडली. १९१७ मध्ये मुंबईच्या सिडनेहॅम महाविद्यालयात ते अर्थशास्त्राचे प्राध्यापक झाले. त्या ठिकाणीही त्यांना जातीयतेचा दाहक अनुभव आला. १९२० साली त्यांनी राजीनामा दिला. त्याच वर्षी त्यांनी 'मुकनायक' हे वृत्तपत्र काढले व दलितांच्या दुःखाना वाचा फोडण्याचे कार्य केले. १९२० साली कायद्याचा अभ्यास करण्यासाठी पुन्हा ते इंग्लडला गेले. शाहू महाराजांनी त्यांना आर्थिक मदत केली. १९२३ साली बॅरिस्टर होवून ते भारतात परतले व मुंबई उच्च न्यायालयात वकिली व्यवसायास प्रारंभ केला. परंतु या ठिकाणीही अस्पृश्य असल्यामुळे त्यांच्याकडे केसेस येत नसत. १९२४ मध्ये दलितांच्या प्रश्नांचा विचार करण्यासाठी 'बहिष्कृत हितकारीणी सभा' स्थापन केली. १९२७ मध्ये 'बहिष्कृत भारत' हे वृत्तपत्रही त्यांनी सुरु केले व या व्दारे दलित समाजाचे प्रश्न अतिशय पोटतिडकीने आणि नेटाने मांडले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या जीवनात अनेक अलौकिक असे ग्रंथाची निर्मिती केली त्यापैकी पाकिस्तानसंबंधीचे विचार, पुर्वी शुद्र कोण होते?, जातिव्यवस्थेचे विचार, हिंदू धर्मातील कोडे, ब्रिटिश भारतातील प्रांताची वित्तीय रचना, रूपयाचा प्रश्न इत्यादी...

१९५१ मध्ये बौध्द जनसंघाची स्थापना केली व १४ ऑगस्ट १९५६ साली नागपूर येथे आपल्या हजारो अनुयायांसह बौध्द धर्माचा स्वीकार केला.

६ डिसेंबर १९५६ रोजी त्यांचा मृत्यु झाला व एका तेजस्वी युगाचा अंत झाला.

**जगताप पांडुरंग**
बी.ए.तृतीय

# जाणिवांचे अंतरंग

# यशवंतराव चव्हाण - राष्ट्रीय नेते

महाराष्ट्राच्याच नव्हे तर संपूर्ण देशाच्या राजकारणात ज्यांनी आपल्या कर्तृत्वाचा प्रभाव टाकला आणि आधुनिक महाराष्ट्राच्या विकासामध्ये आपल्या दुरगामी निर्णयांनी महाराष्ट्राचा नावलौकिक वाढवला अशा या थोर नेत्यांचे नाव यशवंतराव बळवंतराव चव्हाण असे होते. यशवंतरावांचा जन्म १२ मार्च १९१४ रोजी सांगली जिल्ह्यातील देवराष्ट्रे या गावी एका सामान्य शेतक-याच्या कुटुंबात झाला. त्यांच्या आईचे नाव विठाबाई होते आज आपण ज्या नेत्याचा महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून सार्थ गौरव करतो. ते महाराष्ट्रातील पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण हे सर्वार्थाने लोकनेता होते.

यशवंतराव चव्हाण यांना समतोल राजकारणी, कुशल मुत्सद्दी, व्यवहारचतुर, कुशल प्रशासक, अफाट लोकसंग्राहक साहित्यीक, उत्तम वक्ता, कलारसिक, तत्वचिंतक, कुटुंबवत्सल अशा विविध प्रकारची विशेषणे लावली जातात आणि ती खरीही आहेत मात्र पुरेशी नाहीत. कारण एखाद्या विशेषणाने त्यांचे संपूर्ण व्यक्तिमत्व समजावून घेता येणार नाही एवढे त्यांचे व्यक्तिमत्व व्यामिश्र आणि विविधांगी पैलू असलेले होते.

१९२९ साली भगतसिंग यांनी असेंब्लीत बॉम्ब फेकला आणि नंतर त्यांना यामुळे शिक्षा म्हणून फाशी देण्यात आली. या घटनेचा यशवंतरावांच्या मनावर खोलवर परिणाम झाला. याच घटनेने ते राजकिय जीवनाकडे आकृष्ट झाले तसेच स्वातंत्र्यलढ्याला आयुष्य वाहून टाकण्याचा त्यांनी निर्धार केला. १९३०-३१ साली झालेल्या कायदेभंग चळवळीत त्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. त्यासाठी त्यांनी १८ महिन्याची तुरुंगवासाची शिक्षाही मिळाली. १९४२ साली झालेल्या ऑगस्टक्रांतीच्या चळवळीस प्रारंभ झाला या चळवळीने सातारा जिल्ह्यातील नेतृत्व

यशवंतरावांनी केले होते. याच साली झालेल्या भारत छोडो या आंदोलनातही सहभागी होऊन साता-यातील भूमिगत चळवळीचे नेतृत्व केले. परंतु या चळवळीत दिर्घकाळ भूमिगत न राहता प्रगट होऊन त्यांनी कारावास पत्करला. तसेच वडूज येथे चलेजाव मोर्चा आयोजित करण्यात यशवंतराव चव्हाण यांचा सिंहाचा वाटा होता. त्यांचा या विविध आंदोलनातील सहभाग पाहता ते एक त्यागी देशभक्त व आपल्या मातृभूमीवर उत्कृट प्रेम करणारे नेते होते. असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

१९४६ साली यशवंतराव चव्हाण गृहखात्याचे पार्लमेंटरी सेक्रेटरी झाले. १९४८ साली ते महाराष्ट्र प्रदेश काँग्रसचे चिटणीस झाले. तर १९५२ मध्ये त्यांची क-हाड मतदारसंघातून विधानसभेवर निवड झाली व नागरी पुरवठा मंत्री म्हणून नियुक्ती झाली. अशा अनेक लहान मोठ्या पदावर काम करत असतानाच १ नोव्हेंबर १९५६ रोजी यशवंतराव चव्हाण हे द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून निवडून आले. व्दिभाषीक राज्याऐवजी स्वतंत्रपणे महाराष्ट्र आणि गुजरात राज्य निर्माण करण्याच्या संदर्भात याच काळात विचार विनिमय सुरु झाला. विचारविनिमय सुरु असतानाच यशवंतराव चव्हाण यांनी पंडित जवाहरलाल नेहरूना स्वतंत्र महाराष्ट्रातील आवश्यकता कशी आहे हे स्पष्ट करून दिले. तसेच महाराष्ट्रातील जनतेच्या भावना काय आहेत व त्या किती तीव्र आहेत. उग्र आहेत हेही पटवून दिले आणि स्वतंत्र महाराष्ट्राच्या निर्मितीमध्ये मोलाची कामगिरी बजावली. १ मे १९६० ला महाराष्ट्र राज्य स्वतंत्र झाले. तेव्हा या स्वतंत्र महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद यशवंतराव चव्हाण यांच्याकडे आले. मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी संरक्षणमंत्रीपद स्वीकारण्याच्या कालावधीमध्ये अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर यशवंतरावांनी आपली सर्व शक्ती, बुध्दी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी आखण्यात येणा-या योजनावर केंद्रीत केली. यासाठी जनतेमध्ये जागृती निर्माण करून विकासाच्या विधायक कामासाठी जनतेची मने आणि मनगटे तयार करण्यावर भर दिला. त्यांनी शिक्षण, उद्योग, शेती, विद्युत अशा विविध बाबींचा विचार केला व अशा बाबींबाबत असणारे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या

प्रयत्नांना गौरव कवी करतात...

**"अनेक वर्षाने ये उदया नवा महाराष्ट्र**

**मुख्यमंत्री तु आम्हा लाभला सद्‌गुणी अन् श्रेष्ठ**

**तुच पुढारी रक्षणकर्ता तूच योग्य नेता**

**तूच दाखवी मार्ग आम्हाला विजयाचा आता."**

यशवंतरावांसारखा यशस्वी नेता एका राज्यात कायमचा राहणे शक्य नव्हते म्हणून २० नोव्हेंबर १९६२ साली यशवंतरावांची नेमणूक भारताच्या संरक्षणमंत्रीपदावर झाली. या पदासाठी अनेकजण खटपट करत असतानादेखील हे पद यशवंतरावांकडे आपोआप चालत आले होते त्यावेळी अनेकांना असे वाटत होते की, यशवंतराव काही काळ मुख्यमंत्री असते तर महाराष्ट्राचा विकास अधिक झाला असता परंतु राज्यापेक्षा देश मोठा असतो. देश असेल तरच राज्य असते असा विचार करूनच यशवंतरावांनी संरक्षणमंत्रालयाची सुत्रे आपल्या हाती घेतली. याच वेळी देशाला चीनच्या आक्रमणाला सामोरं जावं लागल. चिनी सैन्यात भारतीय हद्दीत केलेला प्रवेश, भारतीय सेनेची झालेली दारूण अवस्था, याचा भारतीयांवर व त्यांच्या मनावर विपरीत परिणाम झाला. संरक्षण मंत्रीपदाची जबाबदारी असलेल्या कृष्णमेनन यांच्यावर संसदेत चहूबाजूंनी प्रचंड हल्ले होऊ लागले आणि ते हल्ले नेहरूपर्यंत येऊ लागल्याने ही परिस्थिती सावरण्यासाठी नेहरूंनी मेनन यांना पदावरून दूर केले आणि त्या जागी यशवंतरावांची नियुक्ती केली. त्यावेळी स्पष्ट झालेली गोष्ट अशी की, जेव्हा देशावर संकटाचे सावट येते वा देशासमोर प्रश्न निर्माण होतो तेव्हा त्याच्या निवारणासाठी यशवंतराव लागतात. 'हिमालयाचा मदतीला सह्याद्री या कवितेत कवी राज मंगसुळीकर यांनी हीच गोष्ट दाखवून दिली आहे ते म्हणतात...'

**"हिमालयावर येता घाला, सह्यगिरी हा धावून गेला;**

**मराठमोळ्या पराक्रमाने, दिला दिलासा इतिहासाला..."**

चीनने केलेला पराभव आणि माओने केलेला विश्वासघात यामुळे अनेक व सेनादल यांचे मनोबल खचले होते. यशवंतरावांनी संरक्षण मंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारली आणि चीनने एकतर्फी युध्द विरामाची घोषणा केली. चीनच्या या निर्णयानं देशात सर्वत्र चव्हाण साहेबांबद्दल आस्था व विश्वासाची भावना वाढू लागली. मानसिकदृष्ट्या खचलेल्या भारतीय पदावर कार्यरत असताना सैन्याचे आधुनिकिकरण करणे आणि संरक्षण खात्यातील त्रुटी दूर करणे या दोन गोष्टीना अत्यंत महत्व दिले. १९६४ मध्ये अमेरिकेकडून आधुनिक शस्त्रास्त्र मिळविण्यासाठी ते अमेरिकेच्या दौ-यावर गेले. १९६५ साली भारत-पाक युध्द झाले. या युध्दात यशवंतरावांनी संरक्षणाशी निगडित प्राप्त केलेले अत्याधुनिक शस्त्र यामुळे भारताला पाकिस्तानावर विजय मिळविता आला. १९७१ च्या युध्दातही भारताने पाकिस्तानचा निर्णायक पराभव केला व पाकिस्तानचे दोन तुकडे झाले. यामुळे भारताच्या यशावर प्रशस्तीची मोठी कमान उभी राहिली. तसेच चीनचे भारताशी असलेले संबंध बिघडू नये याकडे लक्ष दिले.

१९६५ मध्ये संघाच्या नेत्यांनी साधुंना समोर करून गोवध बंदीसाठी दिल्लीत एक भव्य पण कमालीचा आक्रमक मोर्चा काढला. त्याने सारी दिल्लीच अस्तव्यस्त व अस्वस्थ झाली. जाळपोळ, लुटालूट असे प्रकार घडल्याने तेव्हाचे गृहमंत्री गुलजारी नंदा यांनी त्यांची जबाबदारी स्वीकारून पदाचा राजीनामा दिल्याने गृहमंत्रीपद यशवंतरावांकडे आले. त्यावेळी देशातील परिस्थिती स्फोटक झालेली होती या परिस्थितीत देशातील अंतर्गत शांतता व सुव्यवस्था टिकविणे आणि ती पूर्वपदावर आणण्याचे कार्य यशवंतरावांकडे सोपविण्यात आले आणि ते त्यांनी उत्तमरित्या पार पाडले. या काळात यशवंतरावांना अनेक संकटाना तोंड द्यावे लागले. बंगालमध्ये गोवध बंदीसाठी घेरावाची लाट याचदरम्यान पसरली होती. सतत होणा-या घेरावाला बंगाल सरकारनेच मान्यता दिल्याने स्थिती स्फोटक झाली होती. यावर यशवंतरावांनी आक्षेप घेतला तसेच नक्षलवाद्यांपासून देशाला सावध करण्याचे व नक्षलवाद्यांचा लांडगेतोड करण्याचे काम प्रथम यशवंतरावांनीच यशस्वीरित्या पार पाडले. त्या कामात त्यांना जे यश मिळाले ते नंतरच्या कोणत्याही गृहमंत्र्याला आजतागायत

मिळविता आले नाही. यापेक्षा अधिक लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे त्यांच्या कारकिर्दीत धार्मिक व जातीय तणाव यांना आळा बसला आणि राजकिय कारणाखातर होणारी हमरातुमरीही मर्यादेत राहिली. विद्यार्थ्यांची दंगल, जात व भाषा यावरून होणा-या दंगलीचा आढावा घेताना केवळ कायदा व सुव्यवस्थेची दृष्टी बाळगून चालणार नाही तर त्याला सामाजिक व आर्थिक दृष्टीही हवी यावर यशवंतरावांनी भर दिला. शिवाय यशवंतरावांनी नक्षलवाद व दंगली यामुळे होणा-या हिंसाचाराची दखल संसदेत अनेक वेळा घेतली.

भारताच्या राष्ट्रपती पदावर व्ही.व्ही. गिरी यांची नेमणूक झाली तेव्हा म्हणजेच २६ जून १९७० ला इंदिरा गांधी यांनी गृहखाते आपल्याकडे घेतले आणि स्वतःकडील अर्थखाते त्यांनी यशवंतरावांना सोपविले. यशवंतराव चव्हाण हे देशाचे ११ वे अर्थमंत्री होते. आर्थिक संकटाच्या व मंदीच्या काळात अर्थमंत्रीपद यशवंतरावाकडे आले होते. हे पद त्यांना जेव्हा मिळाले तेव्हा संकटाला सामोरे जाण्याच्या भीतीने ग्रासलेल्या देशाला मोठा दिलासा मिळाला. यशवंतरावांनी जी अंदाजपत्रके सादर केली ती सर्व आर्थिक तुट कमी करणारी, संतुलित स्वरूपाची व विकासाला गती देणारी होती. त्यातून करदात्यांना मदत झाली आणि जीवनावश्यक वस्तूंच्या भावावरही नियंत्रण राहिले. १९७१ ला इंदिरा गांधीची 'गरिबी हटाव' योजना लागू झाली होती. यशवंतरावांनी या योजनेशी समर्पक असे निर्णय आणि तरतूद उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. याच दरम्यान त्यांनी देशातील 'काळापैसा' साठविण्याच्या प्रवृत्तीला आळा घालण्याचा प्रयत्न केला. बँकाचे राष्ट्रीयकरण करण्याबाबत तर ते प्रथमपासूनच आग्रही होते. जेव्हा त्यांच्याकडे अर्थमंत्रीपद आले तेव्हा कॉंग्रेसने या धोरणाची अंमलबजावणी केली वास्तविक पाहता नेहरूंनी जाहीर केलेल्या मिश्र अर्थव्यवस्थेचा विचार करून यशवंतरावांनी शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागाचा विकास करण्याच्या कामात हातभार लावला. त्यांनी सहकारी बँका व सहकारी साखर कारखाने ग्रामीण भागात स्थापन करण्याला प्राधान्य दिले आणि त्यामुळेच काही ग्रामीण भागात विकास होऊन या भागाचे जीवन बदलत गेले त्यांच्या कार्याचा गौरव करताना कवी म्हणतात....

**"यशवंतराव जा सुखचैन जा**

**उभा देश आहे तुझा पाठीराखा**

**तुझी किर्ती वाढो जशी चंद्ररेखा"**

त्यांच्याबद्दल या उक्त्या खरच वास्तवात उतरल्या यशवंतरावांची किर्ती ही दररोज वाढणा-या पोर्णिमेच्या चंद्राच्या आकाराप्रमाणे वाढत गेली आणि त्यांना जनतेची साथ मिळाली. अर्थमंत्री म्हणून काम केल्यानंतर सन १९७४ साली त्यांची भारतातील परराष्ट्र मंत्री म्हणून नियुक्ती झाली. यावेळी त्यांना परराष्ट्र धोरणातील मुत्सद्दी मानले गेले. परराष्ट्रमंत्री म्हणून त्यांनी शेजारील व आंतरराष्ट्रीय पातळीवरील देशाशी मैत्रीपूर्ण संबंध पूर्वीच्याच धोरणास अनुसरून जोपासले. या काळात रशिया, अमेरिका व जपान इ. देशांना भेटी देवून दक्षिण आशियात उदभवू शकणा-या संकटाविषयी त्या देशाच्या परराष्ट्र विभागाचे त्यांनी केलेले जागरण महत्वाचे ठरले. पाकिस्तानच्या मागे इतर अरब व मुस्लिम राष्ट्रांनी संघटित होऊ नये याची दक्षता पंडित नेहरूंनी जशी घेतली तशीच यशवंतरावांनीही घेतली आणि अमेरिका व रशिया यांचा चीनवरील दबाव राहिल याची खबरदारी घेतली. कारण या देशाचा चीनवरील भारतानुकूल दबाव वाढत राहणे आवश्यक होते. अर्थमंत्री म्हणून त्यांनी ब-याच देशांना भेटी दिल्या होत्या. आणि आता परराष्ट्र मंत्री म्हणून त्यांचा जागतिक दौरा सुरु झाला. या काळात त्यांनी आपल्या इतर देशातील मंत्र्याशी असलेल्या ओळखी आणखी दृढ केल्या.

यशवंतराव १९४६ मध्ये मुंबई विधानसभेवर प्रथम पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून निवडून आले. तेव्हापासून ते १९७६ सालापर्यंत या ना त्या मंत्रीपदावर प्रादेशिक तथा केंद्रीय मंत्रीमंडळात राहिले. परराष्ट्रमंत्री हे त्यांचे शेवटचे मंत्रीपद होते.

त्यांची संसदीय कारकिर्द ही अधिकारपदस्थ म्हणून झाली असता. सन १९७७-७८ साली लोकसभेतील विरोधी पक्षनेता म्हणून त्यांची निवड झाली. ते विरोधी पक्षनेते म्हणून काम करत

असताना जनता पक्ष व इंदिरा गांधी यांच्यात तणाव वाढत होता. जनता पक्षाने इंदिरा गांधी यांच्याविरूध्द खटला चालविण्याची तयारी केली होती. या विरोधाला इंदिरा गांधी सामोरे जात होत्या आणि यशवंतरावांनीही हा मुद्दा लोकसभेत उचलून धरावा असे त्यांना वाटत होते पण संसदेपातळीवरील विरोधाला काही मर्यादा असतात व त्या असाव्या अशी यशवंतरावांची धारणा होती. शिवाय यशवंतरावांनी दिर्घकाळ राज्याच्या व नंतर केंद्राच्या मंत्रीमंडळात काम केले होते आणि त्यामुळे देशापुढच्या अडचणींची त्यांना कल्पना होती. या स्थितीत केवळ विरोधी पक्षनेते म्हणून ते सर्व विसरून सरसकट विरोध करणे आपल्याला शक्य नाही व मानवताही नाही असे ते मानत. हीच त्यांची संसदिय वृत्ती होती जी आज कोणत्याही नेत्यात दिसून येत नाही. म्हणून जुलै १९७९ च्या चरणसिंग यांच्या संयुक्त मंत्रिमंडळात उपपंतप्रधान आणि गृहमंत्री म्हणून त्यांची नियुक्ती झाली.

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी शिक्षण घेत असताना कारावास भोगून स्वातंत्र्यसेनानी या नात्याने आंदोलनात सहभागी होणारे यशवंतराव हे भारतातील तीन पंतप्रधानाच्या कारकिर्दीतील मंत्रीमंडळात कोणत्या ना कोणत्या पदावर नियुक्त होते. त्यांनी सत्तापदे भूषवित असतानासुध्दा त्या सत्तापदांचा व स्वतःच्या मिळविलेल्या संपत्तीचा सदुपयोग समाजातील गरीबांच्या कल्याणासाठी झाला पाहिजे हे ध्येय मनाशी बाळगले. असे ध्येय मनाशी बाळगणारे ते पहिलेच नेते होते. आपले प्रगल्भ व्यक्तिमत्व महाराष्ट्राच्या अस्मितेसह भारताच्या सेवेस समर्पणबुध्दीने अर्पण करणारे ते दिग्वीजय नेते होते. पाश्चात्य लेखक हॅल्गन याने आपल्या 'आफटर नेहरू हू?' या पुस्तकात लिहिले आहे की, पंतप्रधान होण्यासाठी जे गुण लागतात ते सर्व यशवंतरावांजवळ होते. केंद्र सरकारात त्यांनी दोन तीन वर्ष काम केल्यास त्यांची या संबंधीची योग्यता अधिकच वाढेल. यावरून आपणास यशवंतरावांची गुणवत्ता व योग्यता कळल्यावाचून राहणार नाही.

शैक्षणिक कार्याला गती देण्यासाठी 'पुस्तिका शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षणापर्यंत' विविधांगी कार्यक्रम त्यांनी मोठ्या प्रमाणावर सुरु केले. 'मुलोद्योग' शिक्षणाला चालना देण्यासाठी

प्रौढ शिक्षणांची व्याप्ती वाढविली. 'मोफत शिक्षणाची' योजना राज्यात प्रथमच त्यांनी सुरु केली. त्यामुळे शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झाली. मराठवाड्यामध्ये शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणात व्हावा यासाठी शैक्षणिक संस्थांना सढळ हस्ते अनुदाने दिली. मराठवाड्यातील स्वतंत्र विद्यापीठाची शिफारस करून २३ ऑगस्ट १९५८ रोजी त्यांचे पंडित नेहरूंच्या हस्ते उद्घाटन केले. मुख्यमंत्रीपदावर असताना त्यांनी कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठाची स्थापना केली. तसेच त्यांनी साता-यात सैनिकी स्कूलची स्थापना केल्याने नॅशनल डिफेन्स अकादमीसाठी शिक्षण मिळण्याची सोय या स्कूलमध्ये झाली. आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठीही त्यांनी एक महत्वपूर्ण निर्णय घेतला. शिक्षणाची गंगा आदिवासी समाजाच्या दारात पोहोचविण्यासाठी त्यांनी या भागात आश्रम शाळांची योजना आखली. त्यांचे हे शिक्षणक्षेत्रातील कार्य बघून एक कवीने लिहिलेल्या काव्यपंक्ती आठवतात त्या अशा.

**"शिवशाहीचे शाहीर तुम्ही**

**निर्मित आला स्वराज्याचे आकाश**

**मातीमधूनी मने घडविली**

**झोपडीत नेत ज्ञानाचा प्रकाश"**

यशवंतरावांची धारणा व वाढ ही वेगळ्या रीतीने झालेली होती. प्रादेशिक व जातीय विचारांवर आधारलेले राजकारण न करता राष्ट्रीय राजकारण करण्याचा त्यांनी अगोदरच निर्णय घेतला होता. त्यांना नेहमी वाटत असते की, मंत्री त्यातही मुख्यमत्री, पंतप्रधान अशा जबाबदारीच्या अधिकारपदावर असलेलया व्यक्तींना केवळ आपण आपल्या खात्यापुरते बांधील आहोत असे न मानता निदान भारतासारख्या देशात तरी सर्वांच्या त्यातही सामान्य लोकांच्या बाबतीत सहानुभूती बाळगली पाहिजे. यशवंतरावांना केवळ असे वाटत नसे तर ते तसे वागतही असत.

नवे विचार जाणून घेणे वेगवेगळे ग्रंथ वाचणे ही, यशवंतरावांची प्रवृत्ती होती तरी ते व्यावहारीक राजकारणातील डावपेचात कमी पडत नसत. राजकारणात तर हे अपेक्षितच असते.

पण केवळ डावपेचात व्यग्र न राहता आपल्या धोरणास काही वैचारिक अधिष्ठान असल्याचे ते दाखवून देत. यशवंतराव म्हणत की, राज्यकारभाराची खरी कसोटी लोकांच्या समाधानात आहे. सरकार चांगले असून उपयोग नाही तर सरकार चांगले आहे. राज्यकारभार चांगला आहे असे लोकांना वाटले पाहिजे, जाणवले पाहिजे तरच तो सरकारी कारभार चांगला म्हणता येईल. ते स्वतः नक्षलवादी कारवायांचीही चिकित्सा करताना हे आंदोलन कशामुळे, कोणत्या, राजकिय, आर्थिक, सामाजिक व धार्मिक कारणास्तव घडले याकडेही लक्ष देत असत. त्यांनी हिंसक कारवायांना प्रतिबंध करण्यासाठी उपाय योजले तरीही त्यांच्या कारकिर्दीत दिल्लीत निर्देशकांवर विनाकारण लाठीहल्ला झाला पण त्याबद्दल यशवंतरावानी माफीही मागितली होती.

देशातील विविध पदे भूषवित असताना त्यांनी शेतीच्या विकासावरही भर दिला. भारत हा कृषीप्रधान देश आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणाच शेती आहे त्यामुळे शेतीचा विकास अनिवार्य आहे. असे त्यांचे मत होते. शेतीचं नुसतं एकरी उत्पादन, चांगले वाण करून चालत नाही तर त्यावर प्रक्रिया, कृषी उद्योग, कृषी क्रांतीची महत्वपूर्ण अशी योजना व विचार त्यांनी समाजात रूजवले. देशात अर्थवत्ता व समाजालासुध्दा अर्थवत्ता ऊसाची कारखानदारीच नव्हे तर कापूस प्रक्रिया सुतगिरण्या व कापडाशी संबंधीत जगत निर्माण करीत शेतक-यांना उभ करणार असव असे निर्णय त्यांनी घेतले व त्यातील ते निर्णय फलद्रूप झाले. त्यामुळेच असे म्हटले जाते कि औद्योगिक क्रांतीचा पाया यशवंतरावांनी घातला. त्यांच्या कर्तृत्वाचे वर्णन करताना कवी ग.दि.माडगुळकर म्हणतात,

**तुझी साथ तुझे आशीर्वाद प्राणांचे दुवे मिळवीत**

**तुझी साथ तुझे आशीर्वाद घरभर दिवे लावून**

संविधानाने आपल्या देशात सामाजिक तत्व प्रस्थापित केले असतानाही देश जातीय उच्च नीच कल्पनांनी पोखरून निघाला आहे हा भेद दूर करण्यासाठी यशंवतराव झटले. राजकारण

करत असतानाही ते पक्षाकडे न झुकता राष्ट्रीय चळवळीमध्ये आले आणि बहुजन समाजाच्या विाकसाचे प्रयत्न केले. त्यांच्या शोषणासाठी ते लढले. सर्वसामान्यांना न्याय मिळाला पाहिजे राष्ट्रीय नेत्याला अभिप्रेत होते. असा हा राष्ट्रनेता आम्हाला लाभला याचे वर्णन करताना ग.दि.माडगूळकर म्हणतात,

**कोटि मुखांनी आशिर्वच दे महाराष्ट्र माता**

**औक्षवंत व्हा, विजयवंत व्हा, प्रियतम यशवंत**

**तुमच्या लेखी नगरी नगरी देवराष्ट्रे**

**घराघरातून उभ्या ठाकल्या वरदा विठोबा**

**स्वति वांछतो जनपुरुषत्तमा, उंचावून**

**सह्याद्रीच्या शिखरी उठती स्वायभव स**

**सातपुड्याच्या कड्यात घुमती त्याचे पडसाद**

**अजातशत्रु आज लाभला आम्हा राष्ट्रा.**

राष्ट्रीय नेता म्हणून संबोधलेल्या नेत्याचे खंबीरता आणि समजूतदारपणा हे यशाचे यशवंतरावाच्या यशाचे रहस्य सांगताना लिहिले की, यशवंतरावांना वक्तृत्वाची देणगी आहे. त्यांच्या भाषणात भाषेचा फुलोरा नसतो पण प्रश्न कितीही अवघडत असला तरी तो ते खंबीरपणे व सहजतेने हाताळतात. यशवंतरावांचे कर्तृत्व चौफेर स्वरूपाचे होते. त्यांना लहानपणी विचारले असता 'तुला मोठेपणी काय बनायचे आहे?' तेव्हा त्यांनी उत्तर दिले होते की, मला यशवंतराव बनायचे आहे. त्यांनी हे केवळ बोलून न दाखवता वास्तवातही खरे करून दाखविले. त्यांची एका शेतकरी कुटुंबातून देशाच्या उपपंतप्रधान पदापर्यंतची झेप पाहता, मराठा गडी यशाचा धनी ही उक्ती त्यांच्याबद्दल सार्थ ठरते.

विविध देशाच्या विविध थरातील अधिकार पदावर असणा-या व्यक्तींचा सहवास तया देशातील लोकजीवनाची ओळख इत्यादीमुळे यशंवतरावांचे स्वदेशावरील प्रेम अधिक डोळस होत

गेले. जे केले त्या पलिकडे जाण्याची त्यांना आशा होती उमेद होती. पण म्हणतात ना परिस्थितीपुढे मनुष्याचे काही चालत नाही. परिस्थितीच्या मर्यादा कोणालाच तोडणे शक्य नसते मग ते यशवंतरावांसारखे युगपुरुष का असेनात कधी ना कधी सर्वांना मृत्युला सामोरे जावेच लागते. या राष्ट्रीय नेत्याचेही २५ नोव्हेंबर १९८४ ला दिल्ली येथे निधन झाले. त्यांच्या कार्याचा आढावा घेतल्यास एवढेच म्हणावेसे वाटते...

**"तव सतत स्मरण स्फुरदायी आम्हा घडो**

**त्वदिय गुण, किर्तन सुरम्य कर्णी पडो**

**स्वराज्य हित चिंतनाविण दुजी कथा नावडो**

**तुझ्या समचि आमुचि तनुही देशाकार्य पडो।"**

यशवंतराव आज आपल्यामध्ये नसले तरी त्यांची नाव, त्यांनी केलेले कार्य हे आपल्याला त्यांची आठवण करून देत राहील. ते आपल्याला कधीच विसरता येणार नाही. मंत्रीमंडळातील नेत्यांच्या अपेक्षांना तोंड देत त्यांनी जे समाजकल्याणाचे कार्य केले ते विसरणे अयोग्यच ठरेल. जोपर्यंत महाराष्ट्र अस्तित्वात आहे. मराठी भाषा अस्तित्वात आहे तोपर्यंत यशवंतराव आपल्यातच आहेत याची जाणीव करून देणारा कवी राज मंगसुळीकर म्हणतात,

**या मातीच्या कणकणातून तुझी स्फूर्तीची फुलतील सुमने**

**जोवर भाषा असे मराठी यशवंताची घुमतील कवने'**

माणूस मृत्यू पावला तरी त्याचे कार्य समाजात टिकून राहिले पाहिजे. त्याचप्रमाणे यशवंतरावांनीही मरावे परि किर्तीरूपी उरावे ही उक्ती सार्थ केली आहे. अशा थोर राष्ट्रीय नेता असणा-या व्यक्तीस माझे शतशः प्रणाम...!

**प्रिया तुकाराम सावंत**

बी.ए. तृतीय वर्ष

## अन्नदाता शेतकरी

आपल्या देशात सत्तर टक्के लोकांचा व्यवसाय शेती हाच आहे. शेतक-यांच्या कष्टामुळेच जग जगत आहे. म्हणून शेतक-यास अन्नदाता म्हटले आहे. अन्नाशिवाय आपण जगू शकत नाही. म्हणून शेतक-यांच्या कष्टाचे महत्व मोठे आहे.

निसर्गात पशु-पक्षी-प्राणी यांचे अन्न नैसर्गिकरित्या आपोआप तयार होण्याची योजना आहे. पण माणसांचे अन्न निसर्गाचाच आधार घेऊन शेतकरी तयार करतो. तेव्हाच आपणास अन्न मिळते. कोणत्याही दुस-या प्रकारच्या कष्टाने आपले पोट भरत नाही. डॉक्टर, इंजिनिअर, उद्योगपती, बुध्दीमान यांच्या कष्टाने माणसाची सेवा घडेल, त्यांना प्रतिष्ठा मिळेल, पण त्यांचे व आपले पोट भरण्यासाठी शेतक-यांच्याच कष्टाची गरज आहे. पाळीव जनावराचे पोट शेतीवरच अवलंबून आहे.

**“शिंपल्यात पाणी भरून**
**समुद्र काही दिसत नाही**
**निळ्या भोर आकाशाचा अंत**
**कधी होत नाही**
**शेतकरी या शब्दाचा उल्लेख**
**मात्र शब्दात होत नाही.”**

उन्हात, पावसात, थंडी, वा-यात शेतकरी राबतो. त्याच्या कष्टाला वेळेकाळाची मर्यादा नाही. जमीन, पाणी व पिके यातच तो दिवसभरच का जीवनभर गुरफटला आहे. धान्यांची पेरणी, मशागत, राखण करून आलेले पिक काढून तो घरी आणतो. धान्य, भाजीपाला, फळे शेतकरी आपल्या शेतातून पिकवितो.

शेतक-याचे जीवन कष्टाचे आहे. समाजापासून बराच काळ दूर असतो म्हणून त्याला राहणीमान बदलता येत नाही म्हणून शासन व समाजानेच शेतक-यांना मदत केली पाहिजे.

**शिंपल्याने तळयाची खोली रूंदी मोजता येत नाही**
**हाताने काढलेली फुलांचा काही सुगंध येत नाही**
**तसेच शेतकरी जीवनाचा अर्थ एका ओळीत सांगता येत नाही.**

शेतक-यांनी पण आज शेतीचे सुधारलेले नवे तंत्रज्ञान स्वीकारले पाहिजे. शेतीसाठी

नव्या ज्ञानाचा अभ्यास, प्रयोग केला पाहिजे. नवीन अवजारे वापरून शेतीत सुधारणा घडवून आणली पाहिजे. ईस्त्राईल, अमेरिका, जपान सारखे देश नव्या तंत्रज्ञानाच्या आधारे कष्ट करून प्रचंड उत्पादन काढीत आहेत. त्या प्रकारची आपल्या शेतक-यांना मदत झाली पाहिजे. शेतीच्या मालाच्या पैसा शेतक-याला मिळत असला तरी, पैशाचा मोबदला घेऊन सुध्दा शेतक-यांचे महान उपकार आहेत.

**लई-लई देश महान माझा हिंदुस्थान**
**सीमेवर लढतो माझा हा जवान**
**शेतात राबतो माझा हा किसान**
**ह्यांचा उपकार आहे किती महान**
**लई महान माझा हिंदुस्थान.**

आजच्या तरूणांनी शेतीचे नवे ज्ञान स्वीकारून शेतीकडे वळल्यास त्यांची बेकारी हटेल. देश स्वावलंबी राहील. जो देश अन्नाच्या पोटाच्या चिंतेत राहील त्यांची प्रगती होत नसते. म्हणून सैनिकाबरोबर शेतक-यांचे ही महत्व जाणले पाहिजे.

सर्वांनीच जर शिकले व नोकरी केली तर शेतकरी कोण होणार? म्हणून शेतकरी व्हा व जगाला जगवा व स्वतः जगा.

**जय जवान...!          जय किसान ....!!**

**पल्लवी संभाजी नरवटे**
१२ वी विज्ञान

# आई

**" स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी "**

आई या शब्दात किती प्रेम, किती माया, किती अर्थ भरला आहे! प्रेमाचे रूप म्हणजे आई होय. दयेचा सागर म्हणजे आई होय. आई हा शब्द ऐकला किंवा वाचला की लगेच आपल्याला आईची आठवण येते.

'आ' म्हणजे आत्मा. 'ई' म्हणजे ईश्वर. या दोन्ही शब्दाचा संगम होऊन 'आई' हा शब्द बनला आहे. प्रत्येकाची आई आपापल्या मुला बाळासाठी किती धडपड करते. मुला बाळासाठी स्वतःच्या जीवाची पर्वा न करणारी ती म्हणजे आई होय.

**"अंगुर के बाग में अंगुर लटकते हैं,**
**अंगुर के बाग में अंगुर लटकते हैं।**
**माँ की याद आए तो आँखो से**
**आँसू टपकते हैं।"**

आई माझा गुरु, आई माझा कल्पतरू, पशुपक्षी प्राणी या सर्वांनाच त्यांची आई फार आवडते. प्रत्येक वेळेस आईच्या कुशीत येतात सर्व सुख दुःख त्यांना आईजवळ भेटतात, असे म्हटले आहे. आई म्हणजे पहिली शाळा. आईचा प्रसन्न चेहरा मी कधीही विसरणार नाही. आईच आपल्यावरील प्रेम पाहून वाटते की, आई माझी तर आहेच पण इतरांची सुध्दा आई आहे. आईची थोरवी किती महान आहे. महान व्यक्तींनी महानतेचे श्रेय आईलाच दिले आहे. मन किंवा शरीर दुखावले तर आपल्या तोंडून आईऽऽऽगं हाच शब्द बाहेर येतो. साधुसंतानी सुध्दा आईचीच उपमा दिलेली आहे.

**"दयेचा सागर, प्रीतीचे माहेर, अमृताची धार**
**मांगल्याचे सार ती म्हणजे आई होय."**

आई घराचं मांगल्य असतं तर बाप घराचं अस्तित्व असतं.

**वैष्णवी जयगिर गिरी**
१२ वी विज्ञान

# गोर समाज

गोर समाज या शब्दाचे काळानुसार वेगळे शब्द आले. लम्बांडा, लमाणी, लमाण, बंजारा समाज असे शब्द आले. फार पूर्वी गोर समाजाच्या प्रमुखास नायक असे म्हटले जात होते. परंतु नंतर यात बदल होवून नाईक असे म्हणू लागले. वसंतराव नायक होते परंतु राजकारणामध्ये नायकचे नाईक करण्यात आले. या समाजाच्या पोषाख, आहार, रूढी परंपरा, चाली-रीतीरिवाज, सण-उत्सव हा इतर समाजापेक्षा वेगळ्या पध्दतीने साजरा करण्याची परंपरा आजही आहे. या समाजाचा इतिहास हा खूप इ.स.पूर्वी पासून आहे. परंतु स्वार्थी लोकांनी या समाजाचा इतिहास उजेडात येऊ दिला नाही.

गोर समाज यांचा व्यवसाय म्हणजे मिठाचा व्यापार होता. या समाजाचा इतिहास जरी लिहिलेला नसेल तरी पारंपरिक गीताच्या माध्यमातून गोर समाजाची माहिती मिळते. गोर समाज पूर्वी राजस्थान राज्यात राहत होता. परंतु वस्ती कमी प्रमाणात होती. व्यापारासाठी जास्त प्रवास करावा लागत होता त्यामुळे समाज देशात इतर सर्वच भागात पसरू लागला. ज्या ठिकाणी त्यांची व्यवस्था होऊ लागली त्या ठिकाणी ते वास्तव्य करू लागले.

इंग्रजाच्या काळामध्ये इंग्रज लोक रेल्वे सुरु करण्यासाठी रूळपट्टी बनवण्याचे काम करत होते. त्यावेळी त्यांना काही ठिकाणी खड्डे भरावे लागत असे व काही उंच भाग खोदावे लागत होते. परंतु एका ठिकाणी खोदकाम करताना बांधकाम झालेले घरे आढळून आली त्या वेळी इंग्रजांनी खोदकाम अतिशय चांगल्या प्रकारे करू लागले त्या वेळी त्या कामात एक खूप मोठे गाव आढळून आले. त्यालाच पुढे मोहंजोदडो हडप्पा संस्कृती म्हणतात. हडप्पा संस्कृतीत ज्या काही चाली,रिती, वेशभुषा, अलंकार, दागिने आजच्या गोर समाजाचे व हडप्पा संस्कृती सारखेच आहेत. हे खोदकाम करताना गोर समाजाच्या लक्षात आले. परंतु त्यावेळी इंग्रजाचे राज्य भारतावर होते यावरून लक्षात येते की गोर समाज हा एक प्राचीन काळापासून अस्तित्वात होता व आहे.

गोर समाजामध्ये इतर समाजाप्रमाणे सण उत्सव साजरे होतात. परंतु ते साजरे करण्याची पध्दत वेगळी असते. दिवाळी, धुलीवंदन, होळी, पाडवा या समाजाला ही सणे मोठ्या आनंदाने साजरे केले जातात. होळी खेळणे, दिवाळी मेरा मागणे या सणाचे एक वेगळे वैशिष्ट्ये आहे.

गोर समाजातील देवांची नाव घेतल्यास सर्वात अगोदर सेवालाल महाराजाचे नाव येते. सेवालाल म्हणजे त्या काळात होऊन गेलेले गोर समाजातील संत होय. संत सेवालाल महाराज

म्हणजे देवाचा अवतार समजला जातो. संत सेवालाल यांचा इतिहास जरी लिहिलेला नसेल तरी त्यांनी सांगितलेले गीत आहेत जे आजपर्यंत गायले जातात. बंजारा भजनामध्ये मोठ्या प्रमाणात सेवालाल महाराजाचा इतिहास सांगितला जातो. त्यामध्ये सेवालाल यांनी सांगितले होते की, काही काळानंतर पाणी विकत मिळेल त्याप्रमाणे आज आपणास पाणी विकतच घ्यावे लागते. सेवालाल हे गरीबांना मदत करत असत. त्यांच्याकडे खूप मोठ्या प्रमाणात गाई होत्या. तसेच ते मिठाचा व्यापारही करत असत. त्यांनी म्हणजे सेवालाल महाराज देवपुजेसाठी किंवा बक-याचा बळी दिल्यानंतर त्यांच्या मुंडक्याच्या पुजेसाठी एक हळद, कुंकू व पिठाचे रेषा व वर्तुळ काढून त्याचे चार भाग करण्याचा उद्देश म्हणजे सेवालाल महाराजांना माहीत होते की, पृथ्वीवर चार खंड अस्तित्वात आहे. हे त्यांनी या पुजेच्या माध्यमातून सर्व गोर समाजाला सांगण्याचा प्रयत्न केला व आजही तशी परंपरा आहे.

गोर समाजाला खूप मोठा इतिहास होता. परंतु गोर समाजातील लोक यापासून बेदखल राहिले. आणि आपल्या विकासाची गती थांबवून घेतली यांचा गोर समाजातून दुसरी एक जमात म्हणजे मारवाडी. प्रगत लोकांनी मारवाडी समाज अस्तित्वात आला व मारवाडी आजही खूप मोठ्या प्रमाणात व्यापार करताना दिसतात. या मारवाडी गोर समाजाची व राजस्थान मधील भाषा ७० ते ८० टक्के सारखीच आहे. यावरून लक्षात येते की, मारवाडी, गोर समाज मुळ राजस्थानमधील आहे.

गोर समाज वस्ती करून राहू लागल्यानंतर हे गावापासून दूर तांडा असल्यामुळे त्यांचा विकास थांबला व गावठी दारू अशा अयोग्य मार्गाकडे हा समाज वळला व त्यांचा विकास त्यांनीच थांबवून घेतला. नंतर गोर समाजातील माणसे ऊस तोडणीसाठी जाऊ लागली. आज महाराष्ट्रात बीड जिल्ह्यात ऊस कामगार जास्त आहेत व याच बीड जिल्ह्यात गोर समाज मोठ्या प्रमाणात आहे. परंतु आज गोर समाज विकास प्रवाहामध्ये आलेला दिसून येत आहे.

**बबन नारायण राठोड**
बी.ए.व्दितीय वर्ष

## संस्काराचे महत्व

आजकाल एका गोष्टीची खूपच गरज आहे. असे वाटते ती म्हणजे संस्कार. संस्कार म्हणजेच चांगले गुण, सद्गुण होय. हे मी प्रथमच सांगतो की, आज हे जे भव्य व दिव्य शारदेचे मंदिर (कॉलेज) आहे याच मुळ चांगल्या संस्काराचे माहेरघर आहे. म्हणजेच अगोदर शिका ते चांगले शिका, ही पहिली गोष्ट आहे.

इथे चांगले विचार, चांगले आचार, चांगले साचार, चांगले शिक्षण देणारे गुरु किंवा गुर माऊली हेच चांगल्या संस्काराने संस्कार घडविणारे असतात. असे म्हटल्यावर वावगे होणार नाही. जशी कुंभाराची करणी तशी मातीची खेळणी? मग कुठल्याही शिक्षण मंदिरात जा, लहान मुलांना प्रथम मुळातच चांगले शिक्षण मिळाले व ते शिक्षण घेणा-याची बुध्दीही चांगली असली तर ती व्यक्ती निश्चितच कुठेतरी  चमकल्याशिवाय राहणार नाही. गुरु व गुरूमाऊली मुळातच सुसंस्कारीत असावेत ही पहिली चांगली गोष्ट.

आता दुसरी बाजू अशी ती प्रथम जन्म देणा-या मायबापाची, सुताराने चांगली वस्तू तयार केली तर ती बरेच दिवस तशीच्या तशी राहते तशी आई व वडील यांच्या चांगल्या किंवा वाईट गोष्टी घडतात त्या लहान मुलांच्या मनावर कायम ठसा उमटवितात.

दारू पिणे, बिडी ओढणे असे जसे नको ते संस्कार वडीलाजवळ असतील तर ते संस्कार ही मुल नीट का घेऊ नयेत याचाही विचार करायला हवाच. तर मग वडीलांच्या संस्काराचे महत्व चांगलेच असावे लागते. आईचे संस्कार हेच फार महत्वाचे आहेत कारण मुळारंभ तिथूनच असतो. जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उध्दारी असे म्हणतात, ते काही खोटे नाही

आई जर शिवीगाळ, आदळ, आपट, मारामारी, बायकांशी झोंबाझोंबी करणारी असेल तर मुले प्रथम तेच शिकतात. आई असावी कशी जशी जिजामाऊली तशी. ज्या माऊलीने विचारवंत, आचारवंत गोष्टी सांगून युगपुरुष शिव छत्रपतींना युगाचे स्वामी बनविले. पुढे सुभाष बाबु, महात्मा गांधी, पंडित नेहरू, बाबासाहेब आंबेडकर वगैरे थोर लोकांच्याही माता महाथोर म्हणाव्या लागतील यात वादच नाही.

अशा त-हेने संस्काराचे महत्व, याविषयी माझे हे मत मी व्यक्त केले आहे.तरीही मला वाटते की चांगले किंवा वाईट या दोन्हीही बाजूने संस्काराचे महत्व असते. म्हणूनच चांगले घ्यावे चांगले द्यावे, चांगले बोलावे, चांगले वागावे, यातूनच संस्कार दिसून येतात.

**महेश संदिपान देशमुख**

बी.एस्सी. प्रथम वर्ष

## भारतीय एकात्मता में हिंदी का योगदान

भारत विविधता से सजा हुआ एक महान राष्ट्र है। पुरी दुनिया में केवल भारत ही एक ऐसा देश हैं, जहाँ अनेक प्रांत, धर्म, जाति-पाति, रीति-रिवाज, आचार-विचार, आहार, वेश-भूषा और भाषा बोलनेवाले लोक एक साथ मिल जुलकर रहते हैं। प्रादेशिक, धार्मिक, सांस्कृतिक तथा सामाजिक क्षेत्र में विभिन्नता होते हुए भी भारत में एकात्मता का वास होता है। यही भारतीय संस्कृति की विशेषता है। भारतीय संस्कृति की इसी महत्ता को ध्यान में रखते हुए विश्व में इसे महान संस्कृति का स्थान प्राप्त हुआ है। यह हम सभी भारतवासीयों के लिए गर्व की बात है।

किसी भी राष्ट्र में एकात्मता स्थापन करने का काम राष्ट्रध्वज, राष्ट्रगान, राजमुद्रा इन राजचिन्हों और प्रतीकों की तरह ही राष्ट्रभाषा भी करती है। जो भाषा पूरे देश के लोगों को परिचित हो उसी भाषा को राष्ट्रभाषा का दर्जा प्राप्त होता है। हमारे देश में केवल हिंदी ही एक ऐसी भाषा हे, जो सबको एकसंघ में जोडकर उनको एक होने का एहसास दिलाती है। जिस प्रकार विविध खुशबूवाले, रंगेबिरंगी सुमनों को एक सुंदर और मोहक माला में पिरोने का काम धागा करता करता है, उसी प्रकार भारत के विविध धर्म, जाति-पाँति और संस्कृति के लोगों को एकात्मता के सूत्र में बाँधने का काम हिंदी भाषा कर रही है। इसी कारणवश भारत को भी सुंदर माला की तरह अविस्मयकारक सौंदर्य प्राप्त हुआ है।

भारत एक विशाल संघराज्य राष्ट्र है, जहाँ अनेक प्रांत हैं। इन सभी प्रांतों की अपनी एक भाषा है। जैसे महाराष्ट्र की मराठी, गुजरात की गुजराती, कर्नाटक की कन्नड, बंगाल की बंगाली, आदि। भाषा ही यह विविधता प्रांतों तक ही सीमित नहीं है बल्कि वह एक जिले से दूसरे जिले में एक गाँव से दूसरे गाँव में भी दिखाई देती है। इसीलिए कहा जाता है कि,

**"चार कोस पर बदले पानी।**
**आठ कोस पर बदले बानी ।"**

कोस दर कोस बदलती भाषाओं के कारण एक प्रांत के निवासी लोग दूसरे प्रांत की अधिकृत भाषा नहीं समझ पाते। परंतु आपस में एकता बनाए रखने के लिए हमें एक भाषा की आवश्यकता होती है, जिसे सभी प्रांतों के अधिकांश लोक समझ पाते हो। हिंदी ही एकमात्र ऐसी भाषा है, जिससे देश के सभी लोग परिचित हैं। केवल हिंदी ने ही भारत की १६५२ भाषाओं और बोलियों के समूह में अपनी व्यापकता, सरलता, निर्दोष लिपि आदि गुणों से एक अहम स्थान प्राप्त

किया है। भारत में कश्मीर से लेकर कन्याकुमारी तक, राजस्थान से लेकर बंगाल तक तथा मध्यप्रदेश से लेकर हिमाचल प्रदेश तक हिंदी भाषा को बोलने और जाननेवाले लोगों की संख्या अधिकतम है। देश की आबादी के लगभग ८० प्रतिशत लोग हिंदी भाषा का प्रयोग करते हैं। किसी भी प्रांत का अनपढ व्यक्ति भले ही हिंदी लिख नहीं पाएँ मगर हिंदी बोल जरूर पाता है। इसी वजह से दो अलग भाषिक व्यक्ति अपनी सारी सीमाओं को लाँघकर हिंदी भाषा के माध्यम से आपस में विचारों का आदानप्रदान करते हैं, एकदूसरे के प्रति अपनी भावनाएँ प्रकट करते हैं। जिससे उनमें बंधुत्व की भावना जागरूक होकर एकात्मता प्रस्थापित होती है। इसीलिए हिंदी भाषा को भारत माँ की बिन्दी भी कहा गया है। ओर उसका वर्णन मानवता को अपने आँचल में संजोए हुई भाषा, ऐसा भी किया गया है।

स्वतंत्रतापूर्व कालखंड में भी हिंदी भाषा ने भारतवासियों में एकता निर्माण करने का कार्य किया। फिर चाहे वह १८५७ का स्वतंत्रतासंग्राम हो या फिर १९४७ का स्वतंत्रता आंदोलन हो। जब भी स्वतंत्रता आंदोलन की गति मंद हो जाती थी, तब हिंदी में 'इन्कलाब जिंदाबाद', 'चलो दिल्ली', 'वन्दे मातरम्', 'जय हिंद', 'तुम मुझे खून दो मैं तुम्हे आजादी दुँगा', 'चले जाओ', आदि नारे दिए जाते जिससे सभी भारतीय एकठ्ठा होकर, एकसाथ स्वतंत्रता पाने के काम में जोश के साथ जुड जाते थे। सभी भारतवासीयों को अंग्रेजों के अन्याय अत्याचारों के खिलाफ भडकाने के लिए उनमें जागृति करने के लिए अनेक क्रांतिकारक तथा समाजसुधारकों ने हिंदी भाषा का ही अवलंब किया था। हिंदी भाषा की इस व्यापकता को ध्यान में रखते हुए यह कहना उचित होगा कि,

**जन्म वृथा है उस हिंदी मानव का,**
**हिन्द में जन्म लेकर जिसने हिन्दी न जानी हो।**

**प्रिया तुकाराम सावंत**
बी.ए. तृतीय वर्ष

## कृष्ण रास और जैन रास

कृष्णरास और जैनरास में पहला अंतर यह है कि, कृष्णरास में राधा और कृष्ण का प्रेम प्रदर्शित किया जाता है। किन्तु जैनरास में जैनियों के उपास्य देव अथवा तीर्थंकर का चरित्र प्रदर्शित किया जाता है। दूसरा, कृष्ण रास में कोई जैनी साधु महात्मा, सेठ साहूकार, धनी, मानीदानी भी नायक हो सकता है। तीसरा कृष्णरास के सभी नाटक एकांकी मिलते है। और वे एकांकी इस ढंग से रचे गए है कि दो से अधिक का भी अभिनय एक साथ किया जा सकता है। किन्तु जैनरास से एकांकी और पूर्ण नाटक दोनों उपलब्ध होती है।

**लीला-नाटकों का क्रमिक विकास :-**

ब्रजभाषा के प्रारंभिक रासलीला समन्धी नाटक नन्ददासजी द्वारा विरचित हुए। नन्ददासजी की प्रतिभा सर्वतोमुखी है। उन्होंने मधुर स्वर में गाने योग्य स्फुट गेय हुऐ। पद, भगवान दशमस्कन्ध के अनुवाद रूप में कथा और लीला के रूप में दृश्य-काव्य की रचना की। कारण यह था कि उसमें सूर की तरह तन्मता, तुलसी की तरह प्रबन्ध-पहुता के साथ साथ संवादोंपयुक्त तीखी तर्क-बुध्दी और वाग्वैदग्ध्य भी था।

**मीडिया कि हिन्दी :-**

यह भारतीय युग मिडिया का युग है। मीडिया ने जिस तरह आम और खास मनुष्य जीवन को अपने पकड में लिया है उससे तो यही प्रतीत होता है अगर मीडिया को व्यापक अर्थ में लिया जाए और हिंदी भाषा को इसके संबंध को आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व्यवहार के संदर्भ में जाए परखा जाएँ तो बहुत से पक्ष उजागर होने लगते हैं जो सामान्यतः छुपे ही रहते हैं।

अगर हिंदी भाषा की बात करे तो यह निर्विकार तथ्य है कि खडी बोली ही आज की हिंदी है। खडी बोली के अलावा हिंदी के जो भी अन्य भाषा, उपभाषा, बोलीरूप हैं वे या तो पुरातात्विक महत्व के होकर गए हैं। या फिर आँचल स्तर पर रूप हैं वे या तो आम बोलचाल के भाषाही रूप में सिमटकर रह गए हैं। अवधी, मगही, ब्रज, मालवी, भोजपूरी, गढवाली, कुमाऊंगी, मारवाडी आदि सभी भाषा, बोलियाँ खडी बोली के वर्चस्व को स्वीकार कर चुके हैं। सभी हिंदी खडी बोली को साहित्य को कामकाज की भाषा के रुप में अपना चुके हैं।

**श्रीधर पाटील**
बी.ए. तृतीय वर्ष

## समाचार

संयुक्त भ्रष्टाचार आघाडी का सरकार की स्थापना क.रा.घोटाळे बनें नये प्रधानमंत्री।

हाल ही हुए १७ वे लोकसभा चुनाव में किसी भी पार्टी को स्पष्ट बहुमत नहीं मिला। फिर भी कई पार्टीओं ने मिलजुलकर अपनी एक संयुक्त भ्रष्टाचार आघाडी बनाकर सरकार स्थापन कि है।

इस गठबंधन में भारत बुडाओ पक्ष, आबादी बढाओं पक्ष, भ्रष्टाचार महापार्टी की ज्यादा सिटे है। इसलिए इस पार्टी के प्रमुख क.रा.घोटाळे बने भारत के नए प्रधानमंत्री। उन्हे राष्ट्रपती स.दा.रिकामे ने शपथ दिलाई। इसके साथ कई मंत्रिओं को भी शपथ दिलाई गई, मंत्रीमंडल का विस्तार इस प्रकार है।

| | | | |
|---|---|---|---|
| **प्रधानमंत्री** | **- क.रा. घोटाळे** | **रेलमंत्री** | **- स.दा.धडके** |
| **गृहमंत्री** | **- घ.र.फोडे** | **परराष्ट्रमंत्री** | **- स.दा.आगलावे** |
| **अर्थमंत्री** | **- क.र.बुडवे** | **पर्यटनमंत्री** | **- मा.ल.लुटे** |
| **संरक्षणमंत्री** | **- हा.ना.धोंडे** | **पेट्रोलियममंत्री** | **- ते.ल.चोरे** |
| **कृषीमंत्री** | **- चा.रा.घोटाळे** | **सांसदिय कामकाजमंत्री** | **- फे.का.चपले** |

**कु. रूपाली स्वामी**
बी.ए. द्वितीय वर्ष

## Situation of Woman in Modern Era

Now the whole world is become modern. Modernization takes place a lot of changes in us. In this century every one is indepmendet. The world has expected equality when the god or nature created us in equal mannar and he never makes difference then why we always do this?

This is the age of development and we have to change our mentality. Woman is not inferior to man. Now a days they are educated. Women is playing a great role in all departments, as home maker to administrator in offices.

In the school or colleges girl students are more in numbers than the boys. Not only their quantity is greater but their quality also. The girls are topper in merit lists every where on the other hand we can see that the most of boys are wested their time in other things and do not concentrate on education.

We always read news of rapes, acid attacks and so on because she had denide the praposal of love or marrigae. Women become the victim. Because of one sided love they have to destroy their life and its a dark spot on humanity.

Not only educated girls and women are facing such difficulties but uneducated women also faces thease problems. They faces domastic voilence. Now also men thinks that a women as his property. He never thought that she is also a human being she also have feelings. They faces the problem of dowry system. They suffered as a domestic annimal and always her master is a man!

This is the life of women in the modernity. Our constitution offered us equality and rights as a man. But in reality it not found. In the educated houses also the situation is not so far different. They only cry for equality and rights but no one offers these to their daughters, wives, sisters and mothers also.

So it is on urge to look positively to words the situation of women. And to take proper design about their equality as well as self identity.

So I must end with "Save Girls Save World."

**Shaikh Karishma Mainoddin**

B.A.S.Y

# काव्यसुमन

## नजरेच प्रेम

कळू दे तुझी  नेत्र भाषा
करशील किती निराशा।।
समजून घे माझी प्रेमभाषा
हिच माझी अपेक्षा।
तुझ्या नजरेच मला
उत्तर मिळत नाही।
त्यामुळे माझ मन
कुठच लागत नाही।।
माझी नजर सतत
तुलाच शोधते।
तु दिसलीस की
डोळे भरून येते।।
माझ्या नजरे समोरून
तु निघून गेलीस।
माझ्यासाठी फक्त
स्वप्न शिल्लक ठेवलीस।।
मी तुझ्यावर मनातून
प्रेमच-प्रेम केल।
तु मात्र मला
दुरच-दुर केलं।।

**राठोड बबन नारायण**
बी.ए.तृतीय वर्ष

## जातीचे भांडण

सगळ्यांनीच वाटून घेतले झेंडे रंग
एकतेला करून टाकले भंग।
झेंड्याच्या नावाने राजकारण करतात
गरीबांना उपाशी ठेवून स्वतःच पोट भरतात।
मंदिर, मस्जिद, गुरुद्वार ने
वाटून घेतले देवाला।
देव म्हणतो माणुसकी खरा धर्म
एवढे कुटाने कशाला?
हिंदू म्हणतो, मुसलमान वाईट आहे।
मुसलमान म्हणतो, हिंदू वाईट आहे।
मुसलमान ही वाईट नाही,
हिंदू ही वाईट नाही।
वाईट तर तो माणूस आहे
जो भ्रष्टाचारी, दहशतवादी म्हणून जन्मला आहे!

**राठोड बबन नारायण**
बी.एस्सी.प्रथम वर्ष

## कॉलेजकुमारी

येते ती ॲक्टीव्हावरी
काळा गॉगल डोळ्यावरी
अशी ही आजची कॉलेजकुमारी
काळी सॅफ खांद्यावरी
गाडीची किल्ली बोटावरी
जरा कुणी दंगा केला
लगेच झाली कावरी-बावरी
हाताचे बोट माऊसवरी
नजर मात्र प्रिंटरवरी
प्रिंटआऊट लावतही म्हणे
'लाल जनमिशन कसंतरी'
लेक्चरला ती गडबड करी
प्रॅक्टीकलला ती उशीर करी
परीक्षेत मात्र मैत्रीणीस म्हणे
"सांग बाई काहीतरी"

**महेश संदिपान देशमुख**
बी.ए.व्दितीय वर्ष

## स्त्री शक्ती

खडबडून जागा झालो तेंव्हा
फार उशीर झाला नव्हता,
कारण, अजूनही माझा समाज
गाढ झोपेतच होता.

गाढ झोपेतच होता पण कसा?
डोळे उघडेच ठेऊन झोपला होता.
याचीच खंत मनाला बोचत आहे....
लिहून लिहून किती लिहावे,
सांगून सांगून किती सांगावे.

कल्पनेपेक्षाही भयंकर घटना घडते
सांगणा-यालाही लाज वाटते.
याचीच खंत मनाला बोचत असते.
दामिनी, निर्भया यांना न्याय मिळतो काय?
अजूनही स्त्रीया स्वाभिमानी जीवन जगतात काय?

हाच का तो सावित्रीचा वसा
अन् झाशीच्या राणीचा ठसा?
झुगारून दे फसवी बंधने,
अत्याचारास दोन हात करण्याची
बिंबव तू मने.

बिचारी, अबला बनून राहू नकोस
सबला आहेस तू
खाली मान घालून जगू नकोस.
रणरागिणी तू, मर्दानी तू
भारतमाताही तू
खूब लढी वो, 'झाँसी की रानी' तू.

**सूर्यवंशी राजपाल गोरोबा,** बी.कॉम. व्दितीय वर्ष

## जीवन

“जीवन आहे एक रम्य पहाट
संकटांनी गजबजलेली वादळवाट
सोनेरी क्षणांची एक आठवण
सुख दुःखाची गोड साठवण
प्रेमांच्या पाझरांची वाहती सरिता
नात्याच्या अतुट शब्दाची गुंफलेली कविता
जाणीवेच्या पलिकडचं जगावेगळ गाव
यालाच तर आयुष्य हे एकच नाव.”

आई म्हणजे,
मंदिराचा उंच कळस
रम्य अंगणातील पवित्र तुळस
भजनात गुणगुणावी अशी मंजुळ संतवाणी
वाळवंटात प्यावे असे थंड पाणी
आई म्हणजे,
आरतीत वाजवावी अशी लयबध्द टाळी
वेदनेनंतरची पहिली आरोळी
अनेकांनी गायलेली मनवेधु चारोळी
आई म्हणजे....

**शामबाला माने**
बी.एस्सी. व्दितीय वर्ष

# मैत्री

सायंकाळी समुद्रकाठी फिरताना एका वृध्दानं
एका लहानग्याला किना-यावरून काहीतरी
उचलून समुद्रात फेकताना पाहिलं....
आश्चर्य वाटून तो त्याच्याजवळ गेला तर
तो समुद्राकाठचे तडफडणारे मासे एक एक करून
पुन्हा समुद्राच्या पाण्यात फेकत होता...
न राहावून त्यानं लहानग्याला विचारलं,
समुद्रकिनारी हजारो मासे आहेत, तु कुणा कुणाला
वाचवू शकणार आहेस,
मुठभर मासे वाचवून जगाला काय फरक पडणार
आहे...?
त्या मुलाने आणखी एक मासा समुद्रात फेकून
निरागसपणे उत्तर दिले,
यानं जगाला काय फरक पडेल ते माहित नाही,
पण या माशाला विचारा,
त्याला काय फरक पडला ते?
ज्याचा मी नुकताच जीव वाचवला.

**शामबाला माने**
बी.एस्सी. व्दितीय वर्ष

## दुष्काळातील शेतकरी

निसर्गही कोपला
पावसाने फिरवली पाठ
कोरड्या आभाळाकडे डोळे लावून
शेतकरी बघतोय वाट.
सावकाराचं कर्ज काढून पिकविले त्याने धान्य
दलालाची किंमत त्याला मान्य, सरकारचं धोरण कसं आडमाप
माझा शेतकरी बाप
बघतोय पावसाची वाट.
पावसा कधी भागवशील
माझ्या धरणीमातेची तहान
शेतकरी जगतोय
तळहातावर घेऊन प्राण
जगाचा पोशिंदा, देवानं उपाशी ठेविला, उकीरड्याच्या खताच्या
गाड्या बाप वाहून थकला, फंड आन पेन्शन असे त्याला माप
माझा शेतकरी बाप
बघतोय पावसाची वाट
खतासाठी रांगेत, मार पोलिसाचा खातो
येता मौसम सुगीचा, दाने मोत्याचे वेचतो
पाऊस जरी नाही पडला, तरी निराश न होता
आस ठेवून पावसाची वाट बघतच राहतो
माझा शेतकरी बाप
बघतोय पावसाची वाट.

**पल्लवी भारत पाटील**
बी.ए. तृतीय वर्ष

## भाग्यरेषा

तुझ सौंदर्य कायमच मी
माझ्या डोळ्यात भरून येतो
थोड थांब ना मी तुझ रूप
ह्रदयावर माझ्या कोरून घेतो
जायचच आहे तुला तरी
माझ्यासाठी तु थोड थांब
ये अशी जवळ माझ्या
अशी का बसलीस लांब
कधी काळी होतो तुझा मी
आता परक्या सारख्या वागवू नकोस
स्वप्नात मग्न मनाला माझ्या
तु खडबडून जागवू नकोस
स्वप्नात ही मन माझे
आस तुझीच धरतय
कळत नाही आता ही ते
तुझ्यावरच का मरतय
स्वप्नात असताना मला
वास्तवाच भान नव्हत
जायच आहे तुला परतूनी
याच ही मला ध्यान नव्हतं
ध्यानी मनी नसताना तू
गेलीस अचानक मला सोडून
गुपचूप माझ्या हातावरची
'भाग्यरेषा' तू गेलीस खोडून....

**सचिन पानखडे**

# बेटी

जब-जब जनम लेती है बेटी,
खुशियाँ साथ लाती है बेटी
ईश्वर की सौगात है बेटी,

सुबह की पहली किरण है बेटी
तारों की शीतल छाया है बेटी
आँगन की चिडिया है बेटी

त्याग और समर्पण सिखाती है बेटी
नये नये रिश्ते बनाती है बेटी
जिस घर जाये उजाला लाती है बेटी

बार-बार याद आती है बेटी
बेटी की किमत उनसे पूछो
जिनके पास नहीं है बेटी....

**पुजा विष्णूदास साळुंके**
बी.ए.प्रथम वर्ष

# Life

What is life ?
It's a chain of happiness and sadners
It's a wave
It's a part of love
life is just like this!
What is Life?
It's a attachment of souls
It's a part of body
It's a beautiful journey
Life is just like this!
What is life?
It's a heap of great things
It's a cool breeze
It's a experience of death
Life is just like this!
What is Life?
Life is a eqnation
& Death is its solution!!

**Miss. Waghmare Gayatri M.**
B.A.1st year

# My Aim

When I see a dream
I decide to fulfil in
When I go to make a friendship
I decide to make it trustful
When I realize a truth
I decide to make is my energy
When I look towards my future
I decide make in very bright
When I think of myself
I decide to make relations
When I think about my aim
I found in as my spirit!!

**Miss. Sakhare Shital**
B.A.IInd year

# Mother

What is a mother?
If life is a field
Mother is water
If life is a ship
Mother is a shore
If life is a school
Mother is a slate
If life is a working
Mother is a holiday
If life a sunny day
Mother is a shadow
If life is rain
Mother is an umbrella
If life is a temple
Mother is a Godsers!

**Miss. Sakhare Shital**
B.A.IInd year

# झरोका

**राष्ट्रीय सेवा योजना -**

राष्ट्रीय सेवा योजना ही महाविद्यायीन विद्यार्थ्यामध्ये ज्ञान, स्वावलंबन, राष्ट्रीय एकात्मता आणि वैचारिक बांधणीची प्रयोग शाळा होय. महाविद्यालयीन युवक - युवतींच्या मनात श्रम आणि ज्ञान यांचा सुंदर मिलाफ घडवून आणण्यासाठी रा.से.यो.च्या माध्यमातून विशेष प्रयत्न केले जातात.

महापुरुषांचा समृध्द वारसा व प्रेरणा विद्यार्थ्यापर्यंत पोहचाव्यात यासाठी महापुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी दिनी त्यांच्या कार्यावरती प्रकाश टाकणा-या व्याख्यानांचे आयोजन केले जाते. विशेषतः विद्यार्थ्यांची मने सामाजिक बांधीलकीच्या प्रेरणेने तयार व्हावीत यासाठी प्रबोधन सप्ताह, श्रम-संस्कार कार्यक्रम व पर्यावरणप्रती जागरूकता निर्माण व्हावी या हेतूने विविध उपक्रमाचे आयोजन केले जाते. समाजात असलेल्या विभिन्न रूढी, परंपरांना छेद देत मानवी मूल्यांची प्रतिष्ठा करण्यासाठी हा विभाग प्रयत्नशील आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या चांगल्या कामाबद्दल गौरविले पाहिजे या हेतूने उत्कृष्ट स्वयंसेवक व उत्कृष्ठ स्वयंसेविका पुरस्कार दिले जातात. या विभागाचे प्रमुख म्हणून डॉ. पवार पी.टी. व प्रा. खोकले आर.के. काम पाहतात.

**सांस्कृतिक विभाग -**

महाविद्यालयातील तरूण युवक युवतींच्या मनात संस्कृती आणि कलेप्रती ओढ निर्माण व्हावी, विद्यार्थ्यामध्ये विविध असणारे कलागुण व त्यांचे प्रकटीकरण प्रभावीपणे होण्यासाठी हा विभाग प्रयत्नशील आहे. युवक महोत्सवाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना विद्यापीठ स्तरावर आपले कलागुण दाखविण्याची संधी हा विभाग उपलब्ध करून देतो. वार्षीक स्नेहसंमेलन व वर्षभरात ग्रामीण लोककलेला प्राधान्य मिळावे म्हणून लोककलावंताना निमंत्रित करणे, विद्यार्थ्यामध्ये कलाविष्कार अधिक प्रभावीपणे रुजावेत यासाठी सांस्कृतिक विभाग एक व्यासपीठ म्हणून काम करतो आहे. या विभागाचे काम प्रमुख म्हणून प्रा.गायकवाड एल.डी. व डॉ.मोरे के.व्ही. काम करतात.

**वक्तृत्व व वादविवाद मंडळ -**

या मंडळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यामध्ये वक्तृत्व कलेबद्दलची जाण निर्माण व्हावी किंबहूना महाविद्यालयातून चांगले वक्ते, वैचारिक बांधीलकीची भान असलेली पिढी तयार व्हावी यासाठी

हा विभाग प्रयत्नशील आहे. या विभागाच्या माध्यमातून शहीद बालाजी माले आंतरमहाविद्यालयीन वाद-विवाद स्पर्धा अखंडपणे चालू आहे. तालूका, जिल्हा व राज्य स्तरावर अनेक विद्यार्थी महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व करीत आहेत. या वर्षी अनिल पवार, परमेश्वर चिताडे, बबन राठोड, प्रिया सावंत या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धामध्ये यश संपादन केले आहे. या मंडळाचे प्रमुख म्हणून डॉ. यादव एस.व्ही. व सहाय्यक प्रा.अशोक मोटे कार्यरत आहेत.

**शैक्षणिक गुणवत्ता सुधार समिती -**

या समितीच्या माध्यमातून गुणवत्ता सुधार करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. विद्यार्थी अधिकाधिक ज्ञान केंद्रीत कसा होईल, त्याच्या गुणवत्तेमध्ये वाढ कशी होईल यासाठी ही समिती काम करते. विशेषतः गुणवत्तेच्या बाबतीत अध्यायन, मूल्यांकन आणि परिक्षण याव्दारे विद्यार्थ्यांना सतत मार्गदर्शन केले जाते. त्यासाठी तज्ञ प्राध्यापक वृंद व ग्रंथालयाची सखम टीम काम करते आहे. या समितीचे प्रमुख म्हणून डॉ. माने डी.डी. सक्षमपणे काम करत आहेत.

**सामाजिक शास्त्रे मंडळ -**

या मंडळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक शास्त्रे विषयाचे आंतरविद्याशाखीय महत्व लक्षात आणून दिले जाते. विद्यार्थ्याचे लेखन कौशल्य 'प्रेसिडेंट' विकसीत व्हावे म्हणून 'गर्जना', 'पॉलीटी', 'संपदा', 'समता', 'पृथ्वी' इ. भित्ती पत्रके चालविले जातात. तसेच तज्ञ प्राध्यापकांना निमंत्रित करून सामाजिक शास्त्रांचे विविधांगी दर्शन घडविले जाते. या विभागाचे प्रमुख म्हणून प्रा. शाम लेंडवे काम पाहतात.

**भाषा अभ्यास मंडळ -**

भाषा, साहित्य, संस्कृती आणि कला या अनुषंगाने विद्यार्थ्यामध्ये भाषीक व सांस्कृतिक जाणीवा निर्माण व्हाव्यात यासाठी हे मंडळ काम करते. विद्यार्थ्यामध्ये लेखन कौशल्य व संभाषण कौशल्य विकसित व्हावे. म्हणून निबंध व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले जाते. विशेषतः त्रैभाषिक सुत्र लक्षात घेत तीन भाषांची, भित्तीपत्रके अनुक्रमे, 'अंकुर' (मराठी) 'कालजयी' (हिंदी) व 'माईल स्टोन' (इंग्रजी) चालविली जातात. या विभागाचे प्रमुख म्हणून यावर्षी डॉ. जाधव जे.एस. यांनी काम पाहिले आहे.

**ग्रंथालय -**

ग्रंथालय विभाग विद्यार्थ्यांना वैचारिक खाद्य पुरविण्यचे काम करतो. विद्यार्थ्यांची वैचारिक

जडण-घडण होण्यासाठी ग्रंथालय विभाग अद्ययावत करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. गेल्या वर्षात एकूण ३१० विद्यार्थ्यांना ३८१० पेक्षा जासत वेळा ग्रंथ पुरवठा करण्यात आला. यू.जी.सी.च्या माध्यमातून इंटरनेट सेवा उपलब्ध करण्यात आली असून तिचा प्राध्यापक व विद्यार्थी यांना पुरेपूर लाभ होत आहे. ग्रंथालयाची एकूण ग्रंथ संख्या १०,१४७ असून ग्रंथालयात मराठी, हिंदी व इंग्रजी भाषातील एकूण ३४ नियतकालीके विद्यार्थ्यासाठी उपलब्ध आहेत. ग्रंथालयाचे ग्रंथपाल म्हणून व प्रमुख म्हणून प्रा.भंडे अे.पी. हे काम पाहतात.

**क्रीडा विभाग -**

विद्यार्थ्याचे मन, मेंदू आणि मनगट मजबूत होण्यासाठी क्रीडा विभागाच्या माध्यमातून सातत्याने विविध स्पर्धाचे आयोजन केले जाते. आंतर महाविद्यालयीन व झोनल टेबल टेनीस व शटल बॅडमिंटन स्पर्धांचे आयोजन महाविद्यालयाने केले. इनडोअर स्पर्धेअंतर्गत बॅडमिंटन व टेबल टेनिस स्पर्धेत महाविद्यालयाने सहभाग नोंदविला. क्रीडा विभाग सातत्याने विद्यार्थ्यांच्या शारीरिक क्षमतांच्या प्रभावीपणे विकास करण्यासाठी प्रयत्नशील आहे. या विभागाचे प्रमुख म्हणून प्रा.गुट्टे व्ही.डी. व सहाय्यक प्रा.तांबारे व्ही.जी. काम करतात.

**वाणिज्य मंडळ -**

या मंडळाच्या माध्यमातून वाणिज्य विषयाबद्दलची सखोल माहिती व ज्ञानशाखेतील नवनव्या प्रवाहांची ओळख करून दिली जाते. गेल्यावर्षात वाणिज्य विभागाने दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे यशस्वी आयोजन केले आहे. विद्यार्थ्यांना बँकिंगप्रणालीची माहिती देण्यासाठी विभाग सातत्याने मान्यवर तज्ञांची व्याख्याने आयोजित करतो. या विभागाचे प्रमुख म्हणून डॉ.घाडगे आर.व्ही. हे कार्यरत आहेत.

**विद्यार्थी संसद -**

विद्यार्थी संसदेच्या माध्यमातून विद्यार्थ्यात संसदीय लोकशाही प्रणालीची ओळख व्हावी. आपले प्रतिनिधी आपण निवडावेत व त्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे प्रश्न प्रशासनापर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला जातो. संसदेच्या माध्यमातून मतदार जागृती अभियान राबविण्यात आले. वार्षिक स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या विभागाचे प्रमुख म्हणून डॉ. माने डी. डी. यांनी काम पाहिले.

**डॉ.चिंतामणराव देशमुख स्पर्धा परिक्षा केंद्र -**

या केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यामध्ये स्पर्धापरीक्षे विषयी तयारी करून घेण्यासंबंधी

मार्गदर्शन केले जाते. विशेषतः स्पर्धा परीक्षेसाठी अभ्यासपूरक साहित्य उपलब्ध करून दिले जाते आणि पूर्व तयारीचा भाग म्हणून परीक्षांचे आयोजन केले जाते. या विभागाचे प्रमुख म्हणून प्रा. शाम लेंडवे हे काम पाहतात.

**विद्यार्थी, प्राध्यापक, पालक योजना -**

विद्यार्थ्यांचे पालकत्व स्वीकारून त्यांच्यात गुणवत्ता सुधार करण्यासाठी या योजनेचा उपयोग होतो. विद्यार्थ्यांची गुणवत्ता, उपस्थिती व परीक्षा या संदर्भात संपर्क साधण्यात येतो. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडीअडचणी सोडविण्यासाठी हा विभाग प्रयत्नशील आहे. या विभागाचे प्रमुख म्हणून डॉ.पवार एस.एस. हे काम पाहतात.

**विज्ञान विभाग -**

या विभागाव्दारे विज्ञानशाखेत प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती होण्यासाठी हा विभाग कार्यरत आहे. विशेषतः बेसिक सायन्सची मुलभूत संकल्पना विद्यार्थ्यांमध्ये रूजविण्यासाठी बौध्दीक, प्रात्यक्षिके आयोजली जातात.

विद्यार्थ्यांचा निकाल वाढविण्यासाठी कॅश कोर्स चे आयोजन केले जाते. या विभागाचे प्रमुख म्हणून डॉ. अशोक बिरादार हे काम पाहतात.

## IQAC व NAAC विभाग -

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये NAAC स्टेअरिंग समितीच्या व IQAC च्या विविध बैठका घेण्यात आल्या व मा. संस्थापक अध्यक्ष व मा. प्राचार्यांच्या सुचनेप्रमाणे महाविद्यालयाचे नॅक पूनर्मुल्यांकन करण्याच्या दृष्टीने कार्यवाही केली व विभागाने शैक्षणीक वर्ष २०११-१२, २०१२-१३, २०१३-२०१४ चे AQAR नॅक कार्यालय बेंगलोरला पाठविले तसेच विभागाने या वर्षी महाविद्यालयाची वेबसाईट तयार केली.

महाविद्यालयातील वरील सर्व विभाग व मंडळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानर्जनाच्या वाटचालीत प्रभावीपणे काम पहात आहेत.

## संस्था कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| १) | श्री शिवाजीराव बळवंतराव पाटील | अध्यक्ष |
| २) | श्री दिलीप आबासाहेब पाटील | उपाध्यक्ष |
| ३) | सौ प्रतिभाताई शिवाजीराव पाटील | सचिव |
| ४) | श्री तानाजीराव बळवंतराव पाटील | सदस्य |
| ५) | श्री निळकंठराव हरिदास पवार | सदस्य |
| ६) | श्री अजितसिंह शिवाजीराव पाटील | सदस्य |
| ७) | श्री अप्पासाहेब नारायणराव जाधव | सदस्य |
| ८) | श्री रोहित विठ्ठलराव पाटील | सदस्य |

## स्थानिक व्यवस्थापन समिती

### शिवाजी महाविद्यालय, रेणापूर

ता. रेणापूर, जि. लातूर

| | | |
|---|---|---|
| १) | श्री शिवाजीराव बळवंतराव पाटील | अध्यक्ष |
| २) | श्री अजितसिंह शिवाजीराव पाटील | सदस्य |
| ३) | श्री निळकंठराव हरिदास पवार | सदस्य |
| ४) | श्री आप्पासाहेब नारायण पाटील | सदस्य |
| ५) | डॉ. रमाकांत गणपतीअप्पा वाघमारे | सदस्य |
| ६) | प्रा. डॉ. माने दिलीप दादाराव | सदस्य |
| ७) | प्रा. डॉ. घाडगे रमाकांत वसंतराव | सदस्य |
| ८) | प्रा. डॉ. हांगे अरूण केशवराव | सदस्य |
| ९) | श्री यादव मुंजाबा अर्जुन | सदस्य |
| १०) | प्राचार्य डॉ. आर. एस. अवस्थी | सदस्य/सचिव |

## महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी वर्ग

**डॉ. आर. एस. अवस्थी** (M.Sc. Ph.D)
प्राचार्य

**प्रा. डॉ. विनायक गुट्टे** (M.P. Ed., Ph.D.)
उपप्राचार्य वरिष्ठ

**प्रा. मारूती सुर्यवंशी** (M.A., B.Ed.)
उपप्राचार्य कनिष्ठ

### कला शाखा

**मराठी विभाग**
प्रा. डॉ. जे.एस. जाधव (M.A., Ph.D.)
प्रा. शेरखाने सी. जे. (M.A.)

**हिंदी विभाग**
प्रा. डॉ. एस. व्ही. यादव (M.A., Ph.D.)
प्रा. डॉ. ए. एस. कसबे (M.A., Ph.D.)

**समाजशास्त्र विभाग**
प्रा. एल.डी. गायकवाड (M.A., M.Phil)
प्रा. ए. ए. मोटे (M.A., SET)

**राज्यशास्त्र विभाग**
प्रा. एस.एम. लेंडवे(M.A., M.Phil)
प्रा. एस.आर. चव्हाण (M.A.)

**भूगोल विभाग**
प्रा. डॉ. ए. के. हांगे (M.A., Ph.D.)
प्रा. डॉ. एस.एस. पवार (M.A., Ph.D.)

**इंग्रजी विभाग**
प्रा. आर. सी. जाधव (M.A., M.Phil)
प्रा. डॉ. के.व्ही. मोरे (M.A., M.Phil, Ph.D)
प्रा. भुजबळ एम.एस.(M.A., SET, NET)

**इतिहास विभाग**
प्रा. डॉ. एस. एम. नांदे (M.A., M. Phil. Ph.D.)
प्रा. डॉ. व्ही. जी. तांबारे (M.A., M. Phil. Ph.D.)

**लोकप्रशासन विभाग**
प्रा. पी. आर. शिंदे (M.A., M. Phil.)
प्रा. एम.आय.शेख (M.A., SET)

**अर्थशास्त्र विभाग**
प्रा. डॉ. माने डी.डी. (M.A., M. Phil., Ph.D.)
प्रा. आर.के. खोकले (M.A., M. Phil)

**क्रीडा विभाग**
प्रा. डॉ. व्ही.डी. गुट्टे (M.Ped., Ph. D.)

**ग्रंथालय विभाग : प्रा. ए.पी. भंडे** (M.Lib & Info.Sci., M.Phill)

### वाणिज्य शाखा

प्रा. डॉ. आर. व्ही. घाडगे (M.Com, Ph. D.)
प्रा. डॉ.पी.टी. पवार (M.Com., M.Phil, Ph.D)
प्रा. पी. डी. शेळके (M.Com., M.Phil)

# विज्ञान शाखा

| रसायनशास्त्र विभाग | वनस्पतीशास्त्र विभाग |
|---|---|
| प्रा. जी. आर. नागरगोजे (M.Sc. NET)<br>प्रा. ए. एस. पत्की (M.Sc., NET) | प्रा. डॉ. एस.जी. यादव (M.Sc. Ph.D.)<br>प्रा. सी.जी. साबळे (M.Sc., SET) |
| **गणित विभाग**<br>प्रा. डी.के. राऊत (M.Sc. SET)<br>प्रा. ए. बी. ठेंगे (M.Sc., SET) | **भौतिकशास्त्र विभाग**<br>प्रा. डॉ. ए. आर. बिरादार (M.Sc. Ph.D.)<br>प्रा. डॉ. पी.एम. कुलाल (M.Sc., Ph.D.) |
| **प्राणीशास्त्र विभाग**<br>प्रा. डॉ. एस.व्ही. फडके (M.Sc. Ph.D.)<br>प्रा. डॉ. यु.पी. कांबळे (M.Sc., Ph.D.) | **संगणकशास्त्र विभाग**<br>प्रा. डी.आर. कुलकर्णी (M.Sc. )<br>**इलेक्ट्रानिक्स विभाग**<br>प्रा. डॉ. ए. आर. बिरादार (M.Sc. Ph.D.)<br>प्रा. पी. आर. सावंत (M.Sc.) |

### कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक

## कला विभाग

प्रा. एम. ए. सूर्यवंशी (उपप्राचार्य) M.A. B.Ed.,

प्रा. डी. पी. रणदिवे M.A. B.Ed.,

प्रा. आर. बी. भांदरगे M.A. B.Ed.,

प्रा. एन. एन. सेलूकर M.A. B.Ed.,

प्रा. व्ही. जी. जाधव M.A. B.Ed.,

## वाणिज्य शाखा

प्रा. एम. बी. जाधव M.Com. B.Ed.,

प्रा. एस. के. हालकुडे M.Com. B.Ed.,

## विज्ञान शाखा

प्रा. व्ही. एस. स्वामी M.Sc. B.Ed.,

प्रा. ए. के. अकुसकर M.Sc. B.Ed.,

प्रा. एम. आर. पखाले M.Sc. B.Ed.,

# शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद

१. श्री बी. बी. शिंदे (मुख्य लिपिक)
२. श्री एम. के. सोमवंशी (वरिष्ठ लिपिक)
३. श्री ए. एच. पवार (कनिष्ठ लिपिक)
४. श्री पी. जी. मस्के (सेवक)
५. श्री एस. आर पांचाळ (सेवक)
६. श्री डी. एम. गंगणे (सेवक)
७. श्री एम. ए. यादव (सेवक)
८. श्री ए. यु. काळे (ग्रंथालय परिचर)
९. श्री एस. एन. पवार (प्रयोगशाळा सहाय्यक)
१०. श्री एस. बी. हराळे (प्रयोगशाळा परिचर)
११. श्री जे. एफ. शेख (प्रयोगशाळा परिचर)
१२. श्री के. पी. कांबळे (प्रयोगशाळा परिचर)
१३. श्री एल. के. बोंबिले (प्रयोगशाळा परिचर)

## IQAC-Internal Quality Assurance Cell
## अंतर्गत गुणवत्ता मूल्यमापन समिती

| | | |
|---|---|---|
| १. प्रा. डॉ. पवार पी. टी. | – | समन्वयक |
| २. प्रा. डॉ. हांगे ए.के. | – | सदस्य |
| ३. प्रा. भंडे ए. पी. | – | सदस्य |
| ४. प्रा. शेख एम. आय. | – | सदस्य |

## शाखा निहाय समन्वयक

: कला शाखा :
प्रा. डॉ. हांगे ए. के., प्रा. भांदरगे आर. बी.
(कनिष्ठ विभाग)

: वाणिज्य शाखा :
प्रा. डॉ. पवार पी. टी., प्रा. जाधव एम. बी.
(कनिष्ठ विभाग)

: विज्ञान शाखा :
प्रा. डॉ. बिरादार ए. आर., प्रा. व्ही.एस. स्वामी
(कनिष्ठ विभाग)


## NAAC-National Assesment & Accredition Council
## राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रत्यायन परिषद


| | | |
|---|---|---|
| १. प्रा. शेख एम. आय. | – | समन्वयक |
| २. प्रा. भंडे ए. पी. | – | सदस्य |
| ३. प्रा. डॉ. हांगे ए.के. | – | सदस्य |
| ४. प्रा. डॉ. पी.टी. पवार | – | सदस्य |
| ५. प्रा. डॉ. के.व्ही. मोरे | – | सदस्य |
| ६. प्रा. डॉ. एस.जी. यादव | – | सदस्य |
| ७. प्रा. डॉ. डी.डी. माने | – | सल्लागार |
| ८. प्रा. डॉ. आर.व्ही. घाडगे | – | सल्लागार |
| ९. प्रा. डॉ. एस.व्ही. यादव | – | सल्लागार |
| १०. प्रा. डॉ. व्ही.डी. गुट्टे | – | सल्लागार |
| ११. श्री. बी.बी. शिंदे | – | कार्यालय प्रतिनिधी |
| १२. श्री. एम.के. सोमवंशी | – | कार्यालय प्रतिनिधी |

## महिला तक्रार निवारण समिती

| | | |
|---|---|---|
| १. प्रा. डॉ. मोरे के.व्ही. | – | समन्वयक |
| २. प्रा. डॉ. फडके एस.व्ही. | – | सदस्य |
| ३. प्रा. हालकुडे एस.के. | – | सदस्य |
| ४. प्रा. डॉ. गुट्टे व्ही. डी. | – | सदस्य |
| ५. प्रा. लेंडवे एस.एम. | – | सदस्य |

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड ने
इतिहास विषयात
**प्रा. विजयकुमार तांबारे**
यांना
**पीएच.डी. पदवी**
प्रदान केल्याबद्दल...





**हार्दिक अभिनंदन!**

कर्ममेव जयते

## जे.एस.पी.एम. लातूर (इंडिया) द्वारा संचालित

- **स्वामी विवेकानंद इंटिग्रेशन इंग्लिश स्कुल,** एम.आय.डी.सी. लातूर
- **स्वामी विवेकानंद नॅशनल स्कुल,** मजगे नगर, लातूर
- **स्वामी विवेकानंद नॅशनल स्कुल,** काळेवाडी, पुणे-१७
- **स्वामी विवेकानंद नॅशनल स्कुल,** वाळूज, औरंगाबाद
- **स्वामी विवेकानंद नॅशनल स्कुल,** उस्मानाबाद.
- **स्वामी विवेकानंद प्राथमिक व माध्यमिक स्कुल ,** एम.आय.डी.सी., लातूर
- **महाराष्ट्र प्राथमिक व माध्यमिक स्कुल ,** मजगे नगर, लातूर
- **महाराष्ट्र नर्सिंग कॉलेज** (RANM)**,** मजगे नगर, लातूर
- **महाराष्ट्र नर्सिंग कॉलेज** (RGNM)**,** एम.आय.डी.सी., लातूर
- **स्वामी दयानंद माध्यमिक विद्यालय,** कव्हा
- **इंदिरा बालक मंदीर (सेमी इंग्लिश),** मजगे नगर, लातूर
- **महाराष्ट्र कनिष्ठ महाविद्यालय,** मजगे नगर, लातूर
  (कला, वाणिज्य, विज्ञान व किमान कौशल्य)
- **स्वामी विवेकानंद नॅशनल स्कुल,** रेणापूर
- **छत्रपती शिवाजी प्राथमिक व माध्यमिक विद्यालय,** रेणापूर
- **शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय,** रेणापूर (कला, वाणिज्य, विज्ञान)
- **शिवाजी वरिष्ठ महाविद्यालय,** रेणापूर (कला, वाणिज्य व विज्ञान)
- **शिवाजी प्राथमिक व माध्यमिक विद्यालय,** बिटरगाव
- **शिवाजी माध्यमिक विद्यालय,** सांजा रोड, उस्मानाबाद
- **स्वामी दयानंद मागासवर्गीय वसतीगृह,** कव्हा
- **स्वामी विवेकानंद इन्स्टिट्युट ऑफ पॉलिटेक्निक,** एम.आय.डी.सी., लातूर
- **महाराष्ट्र नर्सिंग कॉलेज** (B.Sc.)**,** एम.आय.डी.सी., लातूर
- **स्वामी विवेकानंद नर्सिंग स्कुल** (RANM)**,** रेणापूर
- CNS **स्कुल , मजगे नगर,** लातूर

# सचित्र महाविद्यालय